



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





✲ वर्ष ६५ वे ✲ अंक १३२ ✲ नांदेड ✲ मंगळवार, दि. १९ मे २०२६ ✲ पृष्ठे ६ ✲ किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# नीट पेपरफुटी प्रकरणात आरसीसीच्या शिवराज मोटेगावकरला सीबीआयने केली अटक






## ९ दिवसांची सीबीआय कोठडी

**लातूर (प्रतिनिधी)–** देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट पेपरफुटीप्रकरणाचे धागेदोरे महाराष्ट्रात सापडले असून सीबीआयने कारवाईचा धडाका लावला आहे. लातूरमधील प्रसिद्ध आरसीसी कोचिंग क्लासेसच्या शिवराज मोटेगावकरला सीबीआयने अटक केली आहे.

सीबीआयने शिवराज मोटेगावकरला अटक केल्यानंतर सोमवारी न्यायालयात हजर करण्यात आले. तत्पूर्वी, ट्रान्झिट रिमांडमध्ये सीबीआयला मोटेगावकरकडून महत्वाची माहिती मिळाली, काही पुरावेही मिळाले, त्यातूनच त्याला अटक करण्यात आली. त्यानुसार, शिवराज मोटेगावकरने २३ एप्रिल रोजी केमिस्ट्रीचा पेपर मिळवला होता, त्याच्या मोबाईलमध्येच लिकड प्रश्नपत्रिका सीबीआयला आढळून आली. तसेच, शिवराज मोटेगावकर हा सेवानिवृत्त प्राध्यापक प्रल्हाद कुलकर्णीसोबत पेपरफुटीत सहभागी होता, हेही निदर्शनास आले.

सीबीआय कोर्टात न्यायाधीशांनी तपास अधिकाऱ्यांना एक प्रश्न विचारला, मोटेगावकरकडे प्रश्नपत्रिका आहेत हे तुम्हाला कसं कळलं? त्यावर, निवृत्त प्राध्यापक कुलकर्णी हा शिवराजसोबत संपर्कात होता, त्याद्वारे ही बाब समोर आली आहे. येथील कोचिंग सेंटरमार्फतच प्रश्नपत्रिकांचे वितरण सुरू होते, अशी माहिती तपास अधिकारी पवन कौशिक यांनी न्यायालयात दिली. त्यानंतर, सीबीआयने आरोपीसाठी १० दिवसांची सीबीआय कोठडी मागितली होती. मात्र, न्यायालयाने ९ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली. त्यामुळे, पुढील ९ दिवस आता शिवराज मोटेगावकरचा मुक्काम सीबीआय कोठडीत असणार आहे.

### दिल्लीच्या सीबीआय कोर्टात केले हजर

नीट पेपरफुटीचे लातूर कनेक्शन समोर आल्यानंतर लातूरमधील प्रसिद्ध आरसीसी कोचिंग क्लासेसच्या शिवराज मोटेगावकरला सीबीआयने अटक केली आहे. तत्पूर्वी सीबीआयने मोटेगावरची ट्रान्झिट रिमांड घेतली होती, २ दिवसांच्या ट्रान्झिट रिमांडमधील प्राथमिक चौकशीत शिवराज मोटेगावकरकडे महत्त्वाचे पुरावे हाती लागल्यानंतर सीबीआयने मोटेगावरकरला अटक करुन आज त्याला सीबीआयच्या कोर्टात हजर केले होते. त्यावेळी, सीबीआय कोर्टाने आरोपीला ९ दिवसांची सीबीआय कोठडी दिली आहे.

### ४२ प्रश्न थेट नीटच्या मुख्य परीक्षेत जसेच्या तसे

मोटेगावकरच्या इन्स्टिट्यूटने घेतलेल्या मॉक टेस्टमधील ४२ प्रश्न थेट नीटच्या मुख्य परीक्षेत जसेच्या तसे आल्याचा आरोप एका पालकाने केला होता. ज्यावरून हा तपास सुरू झाला अन् शिवराज मोटेगावकर यांची तब्बल १० तास चौकशी सीबीआयने केली. सीबीआयच्या तब्बल २८ जणांच्या पथकाने मोटेगावकर यांची चौकशी केली अन् त्यानंतर त्यांना अटक केली आहे.

### लातूरमध्ये क्लासेसची तोडफोड

मोटेगावकरांना सीबीआयने अटक केल्यानंतर लातूर शहराच्या कोकणवाडी परिसरातील आरसीसी मुख्य कार्यालयाबाहेर आणि कॅम्पसमध्ये शिवसैनिक व एमआयएमच्या कार्यकर्त्यांनी जोरदार निदर्शने केली. संतप्त आंदोलकांनी यावेळी क्लासेसच्या बोर्डाला काळे फासले व तोडफोड केल्याचे समोर येत आहे.

# नांदेडमधील मोटेगावकर (आरसीसी) क्लासेससमोर शुकशुकाट

- अचानक सुट्टी दिल्याने विद्यार्थ्यांसह पालकांमध्ये संताप
- तणावाच्या पार्श्वभुमीवर क्लासेससमोर पोलीस बंदोबस्त

**नांदेड (प्रल्हाद कांबळे)–** लातूर येथील शिवराज मोटेगावकर यांना सीबीआयने नीट पेपर फुटीप्रकरणी अटक केल्याचे वृत्त नांदेडमध्ये धडकताच येथील आरसीसी कोचिंग क्लासेस अचानक बंद करण्यात आला. स्वयंघोषित सुट्टी जाहीर केल्याने विद्यार्थ्यांसह पालकांमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे.

विशेष म्हणजे २१ जून रोजी नीटची पुन्हा परीक्षा होत असल्याने विद्यार्थ्यांचा जीव मात्र मोटेगावकर कोचिंग क्लासेसने खुंटीला टांगला आहे. सकाळी सहा वाजताच्या पहिल्या बॅचसाठी विद्यार्थी क्लासेससमोर दाखल झाले होते. मात्र, ट्युशनला सुट्ट्या आहेत, असे सांगत विद्यार्थ्यांना परत पाठवण्यात आले.

मोटेगावकर यांच्या अटकेची बातमी शहरभर पसरल्यानंतर आरसीसीच्या सर्व गेटला मोठे कुलूप लावण्यात आले. नीट यूजी पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने रेणुकाई केमिस्ट्री क्लासेस (आरसीसी)चे संस्थापक शिवराज रघुनाथ मोटेगावकर यांना लातूरमधून अटक केली आहे. अटकेनंतर नांदेडमधील विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, पुढील वर्ग सुरू होणार का? याबाबत अनिश्चितता आहे. दरम्यान, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परिसरात पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.






# नांदेडसह राज्यातील विधान परिषदेच्या १६ जागांसाठी निवडणूक जाहीर; १८ जूनला मतदान

- नांदेडमध्येही रंगतदार निवडणुकीची शक्यता
- भाजपकडून माजी आ. अमर राजूरकर तयारीत
- राष्ट्रवादीला जागा सोडण्याची मागणी करीत आ. चिखलीकरांनीही दंड थोपटले

**नांदेड (प्रतिनिधी)–** पावसाळी अधिवेशनाआधी विधान परिषदेच्या सदस्यसंख्येत आणखी भर पडणार आहे. नांदेडसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. १८ जून रोजी मतदान तर २२ जून रोजी मतमोजणी होणार आहे. एकूण १७ जागांवर निवडणूक होणार, ज्यातील एका ठिकाणी पोटनिवडणूक होणार आहे. चंद्रशेखर बावनकुळे आमदार राहिलेल्या विधान परिषदेच्या नागपूर मतदारसंघासाठी देखील पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाच राज्यात न झाल्याने या मतदारसंघामध्ये पूर्वी निवडून आलेल्या आमदारांचा कार्यकाळ संपुष्टात येऊनही निवडणूक होऊ शकली नाही. अशात, गेल्या दोन अडीच वर्षांपासून आमदारकीच्या जागा रिक्त आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील एकूण मतदार संख्येच्या ७५ टक्के मतदार संख्या असेल तर विधान परिषदेची निवडणूक घेता येते. विधान परिषदेच्या एकूण ७८ सदस्य संख्येपैकी २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे निवडून जात असतात.

### माजी आमदार राजूरकर यांची तयारी

नांदेडमध्येही विधान परिषदेसाठी स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात ही निवडणूक होणार आहे. माजी आमदार अमर राजूरकर यांनी गेली दोन टर्म (१२ वर्ष) या मतदारसंघाचे काँग्रेसच्यावतीने प्रतिनिधित्व केले आहे. आता यावेळी पुन्हा माजी आमदार अमर राजूरकर हे या निवडणुकीसाठी तयारीला लागले असून







भाजपकडून ते उमेदवारीसाठी प्रबळ दावेदार मानले जात आहेत.

### आमदार चिखलीकरही आग्रही

दुसरीकडे महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनीही दंड थोपटल्याचे दिसून येत आहे. नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीमध्ये राष्ट्रवादीने अनेक तालुक्यात चांगले यश मिळविल्याने या मतदार संघात राष्ट्रवादीची मतदारसंघही लक्षणीय आहे. त्यामुळे विधान परिषदेची स्थानिक स्वराज्य संस्थेची नांदेडची ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसला सोडण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली आहे. त्यांचे पुत्र प्रवीण पाटील चिखलीकर यांच्यासाठी ते आग्रही असल्याचे सांगितले जात आहे.

# राज्य राखीव पोलीस दलाची परीक्षा अखेर रद्द

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र पोलीस भरती प्रक्रियेसंबंधी मोठी बातमी समोर आली आहे. राज्य राखीव पोलीस दल गट क्रमांक ५, दौंड येथील सशस्त्र पोलीस शिपाई भरतीची लेखी परीक्षा अखेर रद्द करण्यात आली आहे. प्रश्नपत्रिकेतील १०० पैकी तब्बल ८५ प्रश्न एका खासगी प्रकाशन संस्थेच्या सराव प्रश्नसंचातून जसेच्या तसे घेतल्याचा आरोप झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. आता २४ मे २०२६ रोजी नव्याने लेखी परीक्षा घेतली जाणार असल्याची माहिती पोलीस दलातील वरिष्ठ सूत्रांनी दिली आहे. ही परीक्षा दत्तकला शिक्षण संस्था, स्वामी चिंचोळी, दौंड येथे पार पडणार होती. आता ती परीक्षा अधिकृतपणे रद्द करण्यात आली आहे.

# गॅस वितरणाच्या भोंगळ कारभाराविरोधात नायगावात संतप्त नागरिकांचा चक्काजाम

## रिकाम्या टाक्या रस्त्यावर फेकून तीव्र आंदोलन

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** नायगाव शहरातील गॅस वितरण व्यवस्थेच्या भोंगळ कारभाराविरोधात सोमवारी नागरिकांचा संताप अखेर रस्त्यावर उतरला. शहरातील डॉ. हेडगेवार चौकात सोमवार, दि. १८ मे रोजी सकाळी सुमारे ११ वाजेच्या सुमारास शेकडो नागरिकांनी रिकाम्या गॅस टाक्या थेट रस्त्यावर फेकून चक्काजाम आंदोलन छेडले.


या अचानक उभ्या राहिलेल्या आंदोलनामुळे नांदेड-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक जवळपास तासभर पूर्णपणे विस्कळीत झाली होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.





गेल्या अनेक दिवसांपासून शहरात घरगुती गॅस सिलेंडर वितरणात मोठा विलंब होत असल्याने नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहेत. ऑनलाईन बुकिंग करून ओटीपी प्राप्त होऊनही तब्बल दहा ते पंधरा दिवस गॅस सिलेंडर घरपोच मिळत नसल्याची गंभीर तक्रार नागरिकांनी केली. अनेक कुटुंबांमध्ये स्वयंपाकाचे हाल होत असून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांचे मोठे हाल सहन करावे लागत असल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, वारंवार एजन्सीशी संपर्क साधूनही समाधानकारक उत्तर दिले जात नसून वितरण व्यवस्थेत पूर्णपणे निष्काळजीपणा दिसून येत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. सोमवारी सकाळी काही नागरिक गॅस संदर्भात विचारणा करण्यासाठी शगुन इंडियन कार्यालयात गेले असता कार्यालय बंद असल्याचे दिसून आले. यामुळे आधीच संतप्त असलेल्या नागरिकांचा संताप अनावर झाला आणि त्यांनी थेट डॉ. हेडगेवार चौक गाठत रिकाम्या गॅस टाक्या रस्त्यावर ठेवून रास्ता रोको आंदोलन सुरू केले. **(पान ३ वर...)**




# नीट परीक्षा : जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ‘एसएफआय’चे आंदोलन

**नांदेड (प्रतिनिधी)–** सबंध देशात गाजत असलेल्या नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी, निकालातील सावळा गोंधळ आणि शिक्षण क्षेत्रातील वाढत्या भ्रष्टाचाराविरोधात १८ मे रोजी स्टुडंटडस् फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) जिल्हा कमिटीच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवारी निदर्शने करण्यात आली. यावेळी संतप्त विद्यार्थ्यांनी केंद्र सरकार आणि शिक्षण माफियांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.




आंदोलनानंतर एसएफआयच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले. या निवेदनात एसएफआयने आरोप केला आहे की, राष्ट्रीय परीक्षा एजन्सीने (एनटीए) नीट परीक्षेच्या गोपनियतेचा पुरता खेळखंडोबा केला असून वारंवार होणाऱ्या पेपरफुटीमुळे सामान्य कुटुंबातील गोरगरीब विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची थट्टा होत आहे. हा केवळ एक घोटाळा नसून प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या कष्टाची दिवसाढवळ्या झालेली लूट आहे. या पार्श्वभूमीवर देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या या गंभीर घोटाळ्याची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मुख्य मागणी संघटनेने केली आहे. तसेच या संपूर्ण घोटाळ्याची सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांमार्फत सखोल व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, पेपरफुटीच्या मुख्य सूत्रधारांना कठोर कायद्यांतर्गत जन्मठेपेची शिक्षा व्हावी आणि ज्या परीक्षा केंद्रांवरून हे गैरप्रकार झाले आहेत त्यांची मान्यता त्वरित रद्द करण्यात यावी, अशा मागण्याही करण्यात आल्या आहेत. जोपर्यंत परीक्षा प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता येत नाही तोपर्यंत दोषींवर कठोर कारवाई सुरूच रहावी, असेही निवेदनात नमूद केले आहे.

# नीट पेपरफुटी प्रकरणाविरोधात नांदेडमध्ये २० मे रोजी धरणे आंदोलन

**नांदेड (प्रतिनिधी)–** देशभरातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित असलेल्या नीट (National Eligibility cum Entrance Test) परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत करणाऱ्या या गंभीर प्रकाराच्या निषेधार्थ विद्यार्थी कृती समिती, नांदेड यांच्या वतीने दि. २० मे २०२६ रोजी नांदेड येथे एकदिवसीय धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आंदोलनाची दिशा, भूमिका व प्रमुख मागण्या जाहीर करण्यासाठी दि. १८ में २०२६ रोजी दुपारी २.०० वाजता शासकीय विश्रामगृह, नांदेड येथे पत्रकार परिषद घेण्यात आली.

या पत्रकार परिषदेस सुनील पाटील कदम, प्रा. प्रबुद्ध चित्ते, तुषार देशमुख, अंकुश सावते, कैलास वाघमारे, मोहम्मद जाहिद, मुंतजिब देशमुख, सम्राट आठवले यांच्यासह विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

विद्यार्थी कृती समितीच्या मते, नीट परीक्षा ही देशातील वैद्यकीय शिक्षण प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची परीक्षा असून तिच्या पारदर्शकतेवर देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अवलंबून आहे. मात्र, पेपरफुटीच्या सतत समोर येणाऱ्या घटनांमुळे मेहनती व्हिद्यार्थ्यांच्या संधी हिरावल्या जात असून शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास गंभीरपणे हादरला आहे. अनेक व्हिद्यार्थ्यांनी वर्षानुवर्षे कठोर परिश्रम करूनही अन्याय सहन करावा लागत असल्याने मानसिक तणाव, नैराश्य व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

समितीने सांगितले की, देशभरातून उघड होत असलेल्या माहितीमुळे या प्रकरणात मोठ्या प्रमाणावर **(पान ३ वर...)**

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# रेल्वे: धरलं तर चावते अन्...

भारतीय रेल्वे ही देशाची जीवनवाहिनी मानली जाते. दररोज कोट्यवधी प्रवासी रेल्वेच्या माध्यमातून आपल्या कामाच्या ठिकाणी, शिक्षणासाठी, व्यवसायासाठी किंवा कौटुंबिक कारणांसाठी प्रवास करतात. सामान्य माणसासाठी रेल्वे हा केवळ प्रवासाचा पर्याय नसून जीवनाचा अविभाज्य भाग आहे. सध्या मात्र रेल्वेची अवस्था ही धरलं तर पळते सोडलं तर चावते, अशी झाली आहे, कारण अलीकडच्या काळात रेल्वे प्रवास म्हणजे त्रास, अस्वच्छता आणि अनिश्चिततेचा अनुभव बनत चालला आहे. गाड्या तीन-तीन तास, तर कधी पाच-पाच तास उशिरा धावत आहेत. अनेकदा प्रवाशांना प्लॅटफॉर्मवर ताटकळत बसावे लागते. त्यामुळे नागरिकांच्या दैनंदिन नियोजनाचा पूर्णतः बोजवारा उडत आहे. रेल्वे उशिरा धावण्याची समस्या नवीन नाही, पण सध्या ती गंभीर स्वरूप धारण करताना दिसत आहे. वेळापत्रकाचा कोणताही ताळमेळ राहत नाही. एखादा कर्मचारी आपल्या नोकरीसाठी वेळेवर पोहोचू शकत नाही, विद्यार्थ्यांच्या परीक्षा चुकतात, मुलाखतीसाठी जाणाऱ्यांच्या वेळा चुकतात व संधी हुकते. व्यावसायिक बैठका रद्द होतात, तर रुग्णालयात जाणाऱ्या रुग्णांचेही मोठे हाल होतात. रेल्वे उशिरा धावल्यामुळे फक्त वेळच वाया जात नाही, तर मानसिक ताणही वाढतो. प्रवाशांच्या संयमाची परीक्षा घेतली जात आहे. या परिस्थितीत रेल्वेतील अस्वच्छता हा आणखी एक गंभीर प्रश्न बनला आहे. अनेक गाड्यांमध्ये डबे साफ नसतात. टॉयलेटमध्ये पाणी नसते, दुर्गंधी असते, कचरा साचलेला असतो. लांब पल्ल्याच्या प्रवासात ही अवस्था अधिकच असह्य ठरते. अशी परिस्थिती विशेषतः दक्षिण मध्य रेल्वे आणि मध्य रेल्वे यामध्ये जास्त प्रमाणात आढळते आहे. स्वच्छ भारत अभियानाचा मोठा गाजावाजा केला जातो, पण रेल्वेतील प्रत्यक्ष परिस्थिती पाहिली तर अनेक घोषणांची पोलखोल होते. प्रवाशांनी भरपूर भाडे भरूनही मूलभूत सुविधा न मिळणे ही दुर्दैवी बाब आहे. सर्वात चिंताजनक बाब म्हणजे अधिकाऱ्यांची उदासीनता. प्रवासी वारंवार तक्रारी करतात, सोशल मीडियावर आवाज उठवतात, पण त्याची गंभीर दखल घेतली जात नाही. स्टेशनवर चौकशी केली तर गाडी उशिरा आहे एवढेच उत्तर मिळते; पण का उशिरा आहे, किती वेळ लागेल, याची स्पष्ट माहिती दिली जात नाही. प्रशासनाची ही बेफिकिरी नागरिकांचा रोष वाढवणारी आहे. रेल्वे व्यवस्थापनाने प्रवाशांना ग्राहक मानण्याऐवजी अजूनही त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्याचीच भूमिका घेतल्याचे चित्र आहे. अनेक वेळा तर अचानक रेल्वे गाडी रद्द केल्याचा संदेश प्रवाशांना मोबाईलवर मिळतो. अशावेळी प्रवाशांनी पर्यायी व्यवस्था काय करावी आणि कशी करावी? रेल्वेमंत्री नवीन आल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे का, असा प्रश्नही आता उपस्थित होत आहे. कोणताही मंत्री नवीन आला की सुरुवातीला काही अडचणी येऊ शकतात, व्यवस्थेतील बदलांना वेळ लागू शकतो. मात्र, त्याचा फटका सामान्य प्रवाशांना बसता कामा नये. रेल्वे मंत्रालय हे देशातील अत्यंत महत्त्वाचे खाते आहे. येथे निर्णयक्षम आणि उत्तरदायी प्रशासन अपेक्षित असते. जर गाड्या सतत उशिरा धावत असतील, सुविधा कोलमडत असतील, तर त्यामागील जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. कारण गाड्या उशिरा धावणे म्हणजे प्रवाशांच्या वेळेचा अपव्यय नव्हे का? प्रवाशांच्या वेळेला महत्त्व आहे की नाही? आज गरज आहे ती केवळ घोषणा करण्याची नाही, तर कठोर अंमलबजावणीची. एखादी गाडी वारंवार उशिरा धावत असेल, तर संबंधित विभाग, अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. वेळेचे नियोजन बिघडवणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई झाली पाहिजे. खासगी क्षेत्रात वेळ पाळली नाही तर कर्मचाऱ्यांवर कारवाई होते, मग सरकारी व्यवस्थेत शिथिलता का? जबाबदारीची जाणीव निर्माण केल्याशिवाय रेल्वेची सेवा सुधारू शकणार नाही. यासोबतच रेल्वेतील स्वच्छतेसाठी स्वतंत्र आणि प्रभावी यंत्रणा उभारण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक स्थानकावर आणि गाडीत नियमित तपासणी झाली पाहिजे. टॉयलेटमध्ये पाणी नसणे ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. आधुनिक सुविधा, स्वच्छ डबे आणि वेळेवर धावणाऱ्या गाड्या ही आता चैनीची नव्हे, तर प्रवाशांची मूलभूत अपेक्षा आहे. भारतीय रेल्वे ही देशाच्या प्रगतीचे प्रतीक आहे. बुलेट ट्रेनची स्वप्ने दाखवण्यापूर्वी सामान्य प्रवाशांचा रोजचा प्रवास सुखकर करणे अधिक महत्त्वाचे आहे. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये. वेळेवर धावणाऱ्या, स्वच्छ आणि विश्वासार्ह रेल्वेसेवेसाठी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे अन्यथा रेल्वे आणि मी सोबतच धावत आहोत ही उपहासात्मक भावना अधिक तीव्र होत जाईल.

# मुलं जन्मानंतर पती-पत्नीत भांडणं नकोच!

पती-पत्नीनं भांडणं नक्कीच करावी. परंतु केव्हा? मुलं जन्मास घालण्यापूर्वी. जर मुलं जन्मास घातली व त्यानंतर जर पती-पत्नीनं भांडणं केली, तर त्याचा परिणाम मुलांवर होतो. त्यांचा अभ्यास खुंटतो. एवढंच नाही तर सारं आयुष्य उद्ध्वस्त होते.

पती-पत्नी...नेहमीच भांडणं करणारी जोडी. काही ना काही कारणानं दोघांमध्ये भांडणं होतातच. परंतु तेवढंच प्रेमही असतं त्यांचं. त्यामुळंच ती भांडणं विकोपाला जात नाहीत व घटस्फोट होण्याआधी बंद होतात. परंतु काही भांडणं अशीही असतात की जी भांडणं विकोपाला जातात. ज्यातून घटस्फोट नक्कीच होत असतो.

विवाह...विवाह हा एक संस्कार आहे व या विवाह संस्कारानुसार जेव्हा आपल्या आई-वडिलांच्या मर्जीनं विवाह होतात. तेव्हा विवाह झाल्यानंतरचे वितुष्ट दूर केले जातात व संसार टिकवला जातो. परंतु काही विवाह जे पळून जावून केले जातात. त्यांच्यात समजा वितुष्ट आलंच, तर त्यांचा संसार टिकविणं ही तारेवरची कसरतच असते. अशा ठिकाणी हमखास घटस्फोट होतोच व घटस्फोटासारखे प्रकार घडतात.

अलीकडील काळात घटस्फोट होताना नाव ठेवले जाते, पळून जावून लग्न करणाऱ्या प्रेमविरांना. म्हटलं जातं की, त्यांचेच विवाह टिकत नाहीत. त्यांच्यातीलच विवाह हा तुटतात. कारण त्यांना परिवाराचा आशीर्वाद नसतोच. परंतु खरं सांगायचं झाल्यास त्यांचेच विवाह टिकत आ-हेत आज. कारण आजच्या काळात प्रेमाला अतिशय महत्व आलेलं आहे. एकमेकांवर प्रेम करणारे आजचे तरुण जे आपल्या मनानं विवाह करतात. त्यांचं आपापसात एकमेकांवर प्रेम असल्यानं ते एकमेकांपासून दूर राहू शकत नाहीत.



ज्यातून विवाह हे तुटण्याचा संभव कमी असतो. तसा विचार केल्यास आज एकमेकांच्या संमतीनंच होणारे विवाह तूटू लागले आहेत. त्यातच प्रश्न निर्माण झालेला आहे, घटस्फोटाचा.

आजच्या काळात घटस्फोटाचे प्रमाण वाढलेले असून, न्यायालयात कितीतरी यावर आधारित खटले उभे राहताना दिसत आहेत. ज्याचे प्रमाण मोजले असता चिंताजनक आहे. कारण प्रत्येकाला आपलं मत हे प्रिय वाटत असतं व ते आपल्या मतांचा आदर करतात. ज्यातून त्यांचा एखाद्यावेळेसही सन्मान दुखवता येत नाही. असा सन्मान दुखवल्यास बस, भांडण, ताटातूट व घटस्फोटाचे खटले. त्यावेळेस लोकं आपण जन्मास घातलेली मुलं. त्यांचं होणारं अतोनात नुकसान. हेही विचारात घेत नाहीत.

अलीकडील काळात प्रेमविवाह करणाऱ्यांपेक्षा संमतीनंच विवाह करणाऱ्यांच्या विवाहात वितुष्ट निर्माण होतांना दिसत आहे. म्हणतात की, मुलं ही राष्ट्राची संपत्ती. तसं पाहिल्यास मुलं ही परिवाराचीही संपत्ती. पूर्वी तसंच मानलं जायचं. ज्यातून विवाह व्हायचा व विवाहानंतर प्रजोत्पादन. मग मुलं झालीच की संयुक्त कुटुंब पद्धती असल्यानं त्या मुलांना त्यांचे आजी-आजोबा सांभाळायचे व त्याचे आई-वडील शेतावर वा कुठेही मोलमजुरी करायला जायचे. परंतु कालांतरानं काळ बदलला. ज्यातून संयुक्त कुटुंब पद्धती लयास गेली व विभक्त कुटुंबपद्धतीनं जोर पकडला. त्यातच आता घटस्फोटासारखे प्रकार. मग मुलं असलीच तर त्या मुलांचाही विचार केल्या जात नाही. होणारं नुकसान तर दूरच.

घटस्फोट वा कौटुंबिक विवादातून कुटुंब विस्कळीत होतं. त्याचा विचार ना त्या मुलांची आई करीत ना त्याचे वडील. तसं पाहिल्यास प्रत्येकच मुलाला आई व वडील, या दोघांचंही प्रेम हवं असतं. परंतु पतीपत्नींचे वाद हे सतत सुरु असतात. ज्यातून ते विलग होण्याचा विचार करतात व विलगही होतात. त्यानंतर मलं मुली हे कधक आपल्या आईकडे तर कधी आपल्या वडीलांकडे राहतात. ज्यातून ती मुलं आईकडे असल्यास आणि आईनं दुसरा विवाह केल्यास ती मुलं आपल्या सख्ख्या वडीलांच्या प्रेमाला पारखी होतात. कधीकधी तर हेच वडील, अर्थात सावत्र वडील हे त्या स्त्रीची मुलगी जर असेल तर ती वयात आल्यावर तिच्यावर कुनजर ठेवतात. ज्यातून तेच सावत्र वडील तिच्या आईला माहीत होवू न देता मुलीला चक्क विकून टाकतात. जिथे सख्खेच आईवडील आपल्या गरीबीला कंटाळून आपल्या बाळाला विकून टाकतात. तिथं सावत्र वडिलांचा काय नेम? हेच घडत आहे आज. काही ठिकाणी हीच वास्तविकता आहे आजची. काही ठिकाणचं वेगळं आहे. काही ठिकाणी घटस्फोटानंतर मुलं वडिलांकडे राहतात. ती मुलं सोडून जाते. मग काय, ते वडीलही जास्त दिवस विना पत्नीनं राहू शकत नाही. मग तोही दुसरा विवाह करतो. ज्यातून येणारी दुसरी पत्नी ही चांगली निघेलच. याचा नेम नसतो. ती पत्नी ही तिच्या पतीच्या मुलांना मोलकरच समजते. ती त्यांना घरातील सर्व काम करायला ला-वते. मारते, पिटते, सर्वकाही करते. मुली जर असतील तर त्या वयात आल्यावर ती त्यांना वाईट धंद्यातही लावते नव्हे तर प्रसंगी त्या मुलींना विकूनही टाकते व सांगते की ती पळून गेली. ती जेव्हा मुलांना मारत असते. तेव्हाही ती त्यांनाच बराच धाक देते. एवढा धाक देते की ती मुलं अंगावरचे वळ सुद्धा वडीलांना दाखवू शकत नाहीत.


घटस्फोट का घ्यावा? हो, ठीक आहे, आपला पती चांगला निघ-ला नाही. तो मारतो. तो दुसऱ्याच मुलीसोबत संग करतो. तो दारु पितो. तशी घटस्फोटाची बरीच कारणं आहेतच. हे झालं मुलींच्याबाबतीत. मुलं घटस्फोट देतांना, ती मुलगी स्वयंपाक करीत नाही. तिची लैंगिकता बरोबर नाही. ती शक करते. ती कामं करीत नाही. तिची पावलं बरोबर नाहीत. अशी अनेक कारणं. परंतु ही कारणं केव्हा ग्राह्यं धरावी. जेव्हापर्यंत आपल्याला मुलं होत नाहीत. हं, मुलं झालीच तर अशी कारण नकोच संसारात वितुष्ट निर्माण होण्यास. तरीही आपण सांगतोच, अशी अनेक कारणं आणि एकमेकांपासून विलग होतोच.

महत्वपुर्ण बाब ही लक्षात घेण्यासारखी आहे आणि घ्यायलाच हवी की घटस्फोट घ्यायचा असेल तर मुलं जन्मास घालण्यापुर्वीच घ्यावा. मुलं जन्माला टाकूच नये. परंतु मुलं जर जन्मास घातलीच तर आपसातील सर्व हेवेदावे बंद करावे. लेकरांच्या भवितव्याकडं पाहावे. त्यांच्या होणाऱ्या नुकसानाकडे पाहावे. जेणेकरुन माणसानं विवाह केल्यानंतर जेव्हा आपण मुलं जन्मास टाकतो. त्यानंतर मुलांचं नुकसान होणारच नाही. ज्यातून मुलांचं होणारं नुकसान टळेल. कोणी त्यांना नोकर बनविणार नाही. परंतु आपण तीच बाब लक्षात घेत नाही व मुलं जन्मास घालण्याआधी घटस्फोटाचा विचार न करता मुलं जन्मास आल्यानंतर घटस्फोटाचा विचार करतो व विलग होतो. हे काही बरोबर नाही.

महत्वाचं सांगायचं झाल्यास मुलं जन्मास आल्यानंतर त्यांचं शिक्षण सुरु होतं. त्यांचं शिक्षण होत असतांना त्याचं करीअरही घडत असतं. ज्यातून घटस्फोटासारखी प्रक्रिया सुरु होताच किंवा घरात भांडणतंटे सुरु होताच, विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर, त्याच्या शिकण्यावर व त्याच्या करीअरवर परिणाम होतो. पर्यायानं सांगायचं झाल्यास त्याचा अभ्यास खुंटतो. त्याचं शिकणं तुटतं. त्याचं अभ्यासात मन लागत नाही. विशेष म्हणजे मायबापांनी नक्कीच भांडणं करावं. भांडण करायला मनाई नाही. परंतु केव्हा? मुलं जन्मास घालण्यापुर्वी. मुलं जन्मास घातल्यानंतर भांडणं केली तर अभ्यासच नाही तर सारं बुडतं. म्हणूनच त्यांनी मुलं जन्मास घातल्यानंतर भांडण करु नये म्हणजे झालं.

-अंकुश शिंगाडे
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# बारावीनंतरचे करिअर : बी. एस्सी. संख्याशास्त्र हा सुवर्णमध्य!




आजच्या काळात बारावी विज्ञान शाखेचा निकाल लागला की, बहुतांश विद्यार्थी आणि पालकांच्या मनात फक्त दोनच शब्द घोळत असतात 'डॉक्टर' किंवा 'इंजिनियर'. जणू विज्ञान शाखेत प्रवेश घेतला म्हणजे आयुष्याचे हे दोनच रस्ते उपलब्ध आहेत, अशी मानसिकता आपल्या समाजात गेली अनेक दशके तयार झाली आहे. परिणामी, अनेक विद्यार्थी स्वतःची बौद्धिक क्षमता, आर्थिक परिस्थिती, आवड-निवड आणि भविष्यकालीन संधी यांचा विचार न करता नीट, जेईई, सीईटी (NEET, JEE, CET) यांच्या शर्यतीत उतरतात.

जे महाग ते चांगले अशी एक विचित्र मानसिकता आपल्याकडे आढळते. परिणामी जे शिक्षण महाग आहे ते चांगले शिक्षण आहे असा समज पालक आणि विद्यार्थी यांच्यात आढळतो आणि विद्यार्थी विनाअनुदानित शिक्षणाच्या जाळ्यात अलगद सापडतो. लाखों रुपये खर्च करून विद्यार्थी अभियांत्रिकीची पदवी हातात घेऊन नोकरीसाठी फिरताना आपल्याला दिसतात. सोसतही नाही आणि सांगताही येत नाही, अशा अवस्थेत विद्यार्थी जातात. अपरिहार्यपणे पंधरा-वीस हजाराची नोकरी हे फलित काही लाख रुपये आणि तब्बल पाच वर्षे खर्च करून हाती पडते.

उच्च दर्जाचे, चांगल्या करियरच्या संधी असणारे शिक्षण सरकारी पैशाने उपलब्ध आहे याची गंधवार्ता ना पालकांना आहे ना विद्यार्थ्यांना. प्रचलित अनुदानित शिक्षणव्यवस्थेमध्ये रोजगाराच्या चांगल्या संधी असणारे उच्च शिक्षणाचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. दुर्दैवाने याची नीट माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचत नाही. देशात अशा अनेक संस्था आहेत जिथे शिकणाऱ्याला विद्यावेतन दिले जाते.

परंतु प्रत्येक विद्यार्थ्याला डॉक्टर किंवा इंजिनियर होणे शक्य नसते आणि गरजेचेही नसते. उलट, अनेक वेळा लाखो रुपये खर्च करूनही अपेक्षित यश मिळत नाही. त्यानंतर विद्यार्थी आणि पालक दोघेही मानसिक, आर्थिक आणि भावनिक तणावाखाली जातात. अशा वेळी शांतपणे विचार केला तर विज्ञान शाखेतच एक अत्यंत प्रभावी, कमी खर्चिक, गुणवत्तापूर्ण आणि भविष्यात प्रचंड संधी उपलब्ध करून देणारा मार्ग आपल्या समोर उभा असतो- तो म्हणजे बी. एस्सी. आणि विशेषतः बी. एस्सी. संख्याशास्त्र!

Statistics हा करिअरचा असाच एक अद्याप फार प्रसिद्ध नसणारा गुप्त मार्ग आहे. या विषयाचे शिक्षण बी. एस्सी. पदवीमध्ये आपल्या नजीकच्या विज्ञान महाविद्यालयात उपलब्ध असते. हा एक अनुदानित विषय असल्याने अत्यंत नाममात्र फीमध्ये संख्याशास्त्र या विषयात पदवी घेता येते. विशेषतः ग्रामीण भागात अद्यापही या विषयाचे महत्व आणि संधी विद्यार्थ्यांपर्यंत पोहचल्या नाहीत. अभियांत्रिकी नंतर आयटी इंडस्ट्रीमध्ये ज्या नोकऱ्या विद्यार्थी करू इच्छितात, त्या सर्व नोकऱ्या एम. एस्सी. (संख्याशास्त्र) च्या विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत याची माहिती आपल्याला नसते.

आज कृत्रिम बुद्धिमत्ता (rtificial Intelligence), मशीन लर्निंग (Machine Learning), डेटा सायन्स (Data Science), बिग डेटा (Big Data), डेटा ॲनालिटिक्स (Data Analytics), बँकिंग, विमा, शेअर मार्केट, आरोग्य, हवामान, उद्योग, सरकारी योजना, संशोधन, जनगणना, निवडणुका, मोबाईल ॲप्स, सोशल मीडिया अशा प्रत्येक क्षेत्रात डेटा हेच नवीन युगाचे इंधन बनले आहे, आणि या डेटाचा अभ्यास, विश्लेषण, निष्कर्ष आणि भविष्यवेध घेणारे शास्त्र म्हणजे - संख्याशास्त्र (Statistics).

आज जगातील मोठमोठ्या कंपन्या जसे Google, Microsoft, mazon, Meta, Infosys, TCS, Wipro, ccenture यांना मोठ्या प्रमाणावर Data nalyst, Data Scientist, Business Analyst, I Specialist अशा तज्ज्ञांची गरज आहे. या सर्व क्षेत्रांचा पाया हा संख्याशास्त्र वर आधारित आहे. त्यामुळे B.Sc. Statistics करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भविष्यातील करिअरच्या दारांवर अक्षरशः सोन्याची कडी लागलेली आहे.

विशेष म्हणजे, या क्षेत्रात केवळ हुशार विद्यार्थ्यांनाच संधी मिळते असे नाही. सातत्याने अभ्यास करणारा, संगणकाचे मूलभूत ज्ञान असण-ारा आणि गणित-तर्कशक्ती वापरणारा कोणताही विद्यार्थी या क्षेत्रात उत्कृष्ट करिअर करू शकतो. आज अनेक विद्यार्थी बी. एस्सी.संख्याशास्त्र नंतर एम. एस्सी. (संख्याशास्त्र), डेटा सायन्स, कम्प्युटर ॲपलिकेशन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, एम.सी.ए., एम.बी.ए., विमाशास्त्र अशा क्षेत्रात जाऊन लाखो रुपयांचे पॅकेज मिळवत आहेत.

एकेकाळी B.Sc. म्हणजे फक्त शिक्षक होणे अशी जी चुकीची समजूत होती ती आता पूर्णपणे बदललेली आहे. आज संख्याशास्त्र विषयाचा उपयोग उद्योग, IT कंपन्या, संशोधन संस्था, सरकारी विभाग, बँका, विमा कंपन्या, औषधनिर्मिती उद्योग, शेअर बाजार, ई-कॉमर्स, डिजिटल मार्केटिंग, क्रिकेट आणि क्रीडा विश्लेषण अशा सर्व क्षेत्रांमध्ये होत आहे.

आज IPL मधील खेळाडूंचे विश्लेषण असो, Amazon वर आपल्याला दाखवले जाणारे products असोत, YouTube qH$dm Netflix Mr recommendation system असो, हवामानाचा अंदाज असो किंवा निवडणुकीचे Exit Polls असोत, या सर्वामागे संख्याशास्त्र आणि Data Science कार्यरत असते.

खासगी क्षेत्राबरोबरच सरकारी सेवात खास Statisticsच्या पदवीधारकांसाठी राखीव असणाऱ्या अनेक नोकऱ्या राज्य केंद्र सरकारमध्ये उपलब्ध आहेत. Indian Statistical Services ही परीक्षा तर वर्ग-१ दर्जाचा अधिकारी होण्याची संधी Statistics च्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देते. स्टॅटिस्टिक्स हा एकमेव असा विषय आहे ज्याचे केंद्र सरकारमध्ये स्वतंत्र मंत्रालय आहे.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे B.Sc. चे शिक्षण हे सरकारी अनुदानित महाविद्यालयांमध्ये अत्यल्प खर्चात उपलब्ध असते. ग्रामीण आणि तालुकास्तरावरसुद्धा हे शिक्षण सहज उपलब्ध आहे. त्यामुळे गरीब आणि मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांनाही स्वतःच्या घरी राहून दर्जेदार शिक्षण घेता येते. इंजिनियरिंगच्या एका वर्षाच्या फीमध्ये विद्यार्थी इ.डल. पासून M.Sc. पर्यंतचे संपूर्ण शिक्षण पूर्ण करू शकतो.

याउलट, अनेक पालक कर्ज काढून मुलांना खासगी मेडिकल किंवा इंजिनियरिंग कॉलेजमध्ये प्रवेश देतात. लाखो रुपयांचा खर्च, वसतिगृह, जेवण, कोचिंग, प्रवास या सर्वांचा आर्थिक ताण कुटुंबावर पडतो.

-प्रा. विजय कोष्टी,
कवठेमहांकाळ, जि. सांगली)

# विजयकुमार बेंबडे : एक समर्पित मुख्याध्यापक

धोंडीराम बेंबडे हे माझे परम स्नेही मित्र आहेत. शिक्षण क्षेत्रात विशेषत: नांदेड, परभणी व हिंगोली या जिल्ह्यातील शैक्षणिक चळवळीत त्यांचा सक्रिय सहभाग आहे. सजगतेने आणि जाणीवपूर्वक ते कार्यरत आहेत. त्याविषयाची वस्तुस्थिती सांगणे म्हणजे स्तुती नव्हे.

विजयकुमार बेंबडे यांना काही दिवसांपूर्वीच एका विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पिंपरी चिंचवड, पुणे यांच्यावतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे नाव आहे 'श्यामची आई'. हा पुरस्कार विजयकुमार बेंबडे आणि त्यांच्या मातोश्री सौ. शारदाबाई धोंडीराम बेंबडे यांना प्रदान करण्यात आला. पुरस्काराच्या नावातच त्या पुरस्काराची उंची व त्यामागील भूमिका लक्षात येते. काही नावं आपल्या मनात इतकी खोलवर रुतून बसतात की, त्याचा इतिहास, भूगोल आणि त्यांनी निर्माण केलेलं भावविश्व आपल्या मनाला व हृदयाला एका निरागस स्पर्शाने सुखावून जातो. त्या नावाशी जोडलेले भावनांचे रेशीम बंध आपल्याला समाधानाचा आधार देऊन जातात.

सौ. शारदाबाई बेंबडे यांनी सचोटीने, नीतीने, सहिष्णुतेने व सामोपचाराने प्रपंच केला. संजय, विजयकुमार, बालाजी आणि मुलगी सविता



यांच्यावर संस्कार केले. भविष्यात आपल्या मुलांच्या जीवनातून संस्कार, माणुसकी, सहजीवन या गोष्टी दुरावल्या जाऊ नयेत म्हणून त्यांनी डोळ्यात तेल घालून मुलांना वाढवले आणि घडवले सुद्धा. आज समाजात अनेक वाईट गोष्टी बोकाळल्या आहेत. त्याची काळी सावली आपल्या मुलांवर पडू नये यासाठी सौ. शारदाबाई प्रयत्नशील राहिल्या. संस्कार हे एका रात्रीत, एका महिन्यात किंवा काही वर्षात होत नसतात तर, ते घटनानिहाय, प्रसंगानुरूप व कालानुरुप पद्धतीने होत असतात, पण त्यांची जाणीव मुलांना त्या-त्या वेळी करून दिली तर ते संस्कार आजन्म टिकून राहतात. ही जाणीव सौ. शारदाबाईंना त्यांच्या आई-वडिलांनी करून दिल्यामुळेच ती शिदोरी त्यांनी आपल्या मुलांना वाटून दिली.

सौ. शारदाबाईंना कर्करोगासारख्या भयानक रोगाने ग्रासले. बेंबडे परिवाराने वेळीच उपचार सुरू केले त्यामुळेच अशा भीषण रोगाच्या जबड्यातून त्या परत आल्या. परदुःख हे आपल्यासाठी शीतल असते. जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे। या विचाराने जर आपण समजून घेतले तर लक्षात येईल की, कर्करोगामध्ये ज्या यातना होतात त्या नरकयातनाच असतात. सौ.शारदाबाई यांच्यावर अहमदपूर, लातूर आणि पुणे येथे उपचार करण्यात आले. कर्करोगामुळे फक्त रोगीच शरीराने व मनाने काळवंडून जात नाही तर, संपूर्ण कुटुंबच काळजीने, भीतीने, तसेच आपलं माणूस बरं होईल का नाही? या अक्राळ-विक्राळ चिंतेने खचून जातं,नाउमेद होतं. त्यावेळी आधाराचा, मायेचा आणि स्नेहाचा हात, बेंबडे परिवाराच्या पाठीवर होता तो केवळ आणि केवळ, केले कर्म झाले तेचि भोगा आले। या अभंगातील अर्थाचाच. बेंबडे परिवाराशी जोडलेले नातेवाईक व जीवाभावाची माणसं आणि मित्रपरिवार या त्रिसूत्रीमुळे बेंबडे परिवाराच्या आशा पल्लवीत झाल्या. अथक प्रयत्न हा वाक्प्रचार वास्तवात आणण्याची आता वेळ आली होती. आपणास याआधीच सांगितले आहे की, इच्छाशक्ती आणि मनोनिग्रह हा त्या व्यक्ती जवळ असायला हवा. या दोन्ही गोष्टी सोबत सौ.शारदाबाई यांच्या गाठीशी निष्काम सेवेची पुण्याई भरभरून होती.

पुत्र व्हावा ऐसा गुंडा।
ज्याचा तीही लोकी झेंडा।

या उक्तीप्रमाणे विजयकुमार बेंबडे यांचे कार्य आहे. गुंडा म्हणजे गुंड नव्हे तर पंचक्रोशीमध्ये एक चांगला नावलौकिक व्हावा, तीनही लोकांत, संपूर्ण विश्वात त्यांची प्रसिद्धी व्हावी अशी, आई-वडिलांची इच्छा असते. त्या शब्दाला सार्थ ठरवण्यात विजयकुमार बेंबडे यशस्वी झाले आहेत. श्यामची आई पुरस्कार विजयकुमार बेंबडे व त्यांच्या मातोश्री सौ.शारदाबाई बेंबडे यांना प्रदान करण्यामागे दोन गोष्टी आहेत. त्यातील पहिली गोष्ट म्हणजे सौ. शारदाबाई बेंबडे यांनी मुलांवर केलेले संस्कार आणि दुसरी गोष्ट म्हणजे विजयकुमार बेंबडे यांनी स्वतःची नोकरी, कुटुंब सांभाळण्याबरोबरच आई-वडिलांची मनोभावे केलेली सेवा. त्यामुळेच तर हा श्यामची आई पुरस्कार त्यांना प्रदान केला आहे. माणसाने सतत कार्यरत, उद्यमशील व विविध चळवळीशी स्वतःला कसं जोडून घ्यावं याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे विजयकुमार बेंबडे आहेत. त्यांना पुढील जीवनासाठी सदिच्छा आणि शुभेच्छा!

-श्रीहरी आत्माराम वेदपाठक,
लातूर.
मो. ९४२००८०४८५

# २० मे च्या औषध विक्रेता बंद दरम्यान रुग्णांची गैरसोय होऊ नये; अन्न व औषध प्रशासनाचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने देशभरात तसेच राज्यात बेकायदेशीररीत्या इंटरनेट फार्मसीद्वारे होणारी ऑनलाईन औषध विक्री, ई–पोर्टल तसेच GSR ८१७(E) दि. २८ ऑगस्ट २०१८ आणि कोविड संदर्भातील GSR २२०(E) दि. २६ मार्च २०२० हे आदेश मागे घेण्याच्या मागणीसाठी २० मे रोजी एक दिवसीय देशव्यापी बंद पुकारला आहे.

या पार्श्वभूमीवर रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी नांदेड शहरासह तालुका व ग्रामीण भागातील केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनला आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कोणत्याही रुग्णाला औषधांच्या उपलब्धतेबाबत अडचण निर्माण होऊ नये यासाठी आवश्यक व्यवस्था ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय नांदेड, नांदेड–वाघाळा महानगरपालिका आरोग्य विभाग तसेच डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय प्रशासनालाही त्यांच्या औषध भांडारात पुरेसा औषधसाठा उपलब्ध ठेवण्याबाबत कळविण्यात आले आहे.

बंदच्या कालावधीत गरजू रुग्णांना औषधे उपलब्ध न झाल्यास अथवा अत्यावश्यक औषधांची गरज भासल्यास त्यांनी अन्न व औषध प्रशासन कार्यालयाचे सहायक आयुक्त (औषधे) अ. तु. राठोड यांच्याशी भ्रमणध्वनी क्रमांक ८३६९०२७०६८ वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच नागरिकांनी आवश्यक औषधे आगाऊ खरेदी करून ठेवावीत, जेणेकरून संभाव्य गैरसोय टाळता येईल, असेही अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त अ. तु. राठोड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# नेसुबोच्या राष्ट्रीय छात्र सेना विभागास ब्रिगेडियर अनुप बारबरे यांनी दिली भेट



**नांदेड (प्रतिनिधी)**– अभिनव भारत शिक्षण संस्था संचालित नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड येथे दि. १८ मे रोजी राष्ट्रीय छात्र सेना विभागासाठी अत्यंत अभिमानास्पद आणि प्रेरणादायी असा क्षण अनुभवायला मिळाला. छत्रपती संभाजीनगर येथील ग्रुप कमांडर ब्रिगेडियर अनुप बारबरे तसेच ५२ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी., नांदेडचे कमांडिंग ऑफिसर कर्नल दिलीप रेड्डी यांनी महाविद्यालयातील एन.सी.सी. विभागास विशेष भेट दिली.

विद्यार्थ्यांना सैनिकी क्षेत्रातील बदलते आव्हान, राष्ट्रसेवेचे महत्त्व आणि नेतृत्वगुणांविषयी मार्गदर्शन करणे हा या भेटीमागील हेतू होता. यावेळी ब्रिगेडियर अनुप बारबरे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात सत्कार करण्यात आला. त्यानंतर त्यांनी एन.सी.सी. विभागाची सखोल प्रशासकीय तपासणी करत विभागाच्या कार्यपद्धतीचे व विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध कामगिरीचे विशेष कौतुक केले. तसेच भविष्यातही विभागाने याच जोमाने राष्ट्रसेवेची परंपरा पुढे चालू ठेवावी, अशा मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांना संबोधित करताना ब्रिगेडियर अनुप बारबरे म्हणाले की, राष्ट्रीय छात्र सेना ही केवळ संघटना नसून देशभक्ती, शिस्त, धैर्य आणि नेतृत्व घडविणारी एक जीवनशाळा आहे. एन.सी.सी. मधून तयार होणारे विद्यार्थी भारताच्या एकात्मतेचे आणि संरक्षणाचे खरे शिलेदार ठरतात. प्रत्येक कॅडेटने राष्ट्रसेवा हीच सर्वोत्तम सेवा मानून जीवनात प्रामाणिकपणे कार्य केले पाहिजे.

या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील एन.सी.सी. व संख्याशास्त्र विभागाचे प्रमुख लेफ्टनंट डॉ. किशोर इंगळे यांनी केले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुग्रीव फड हे होते. आपल्या अध्यक्षीय समारोपात त्यांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात, शिस्तप्रियतेत आणि राष्ट्रप्रेम जागविण्यात राष्ट्रीय छात्र सेनेची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन केले.

या प्रेरणादायी कार्यक्रमा प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच राष्ट्रीय छात्र सेनेचे बहुसंख्य विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देगलूर येथील अपंग प्रशिक्षण केंद्रात ३० जूनपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– दिव्यांग कल्याण आयुक्तालय पुणे यांच्यामार्फत शासन मान्यता प्राप्त तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र देगलूर या संस्थेत म.रा. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परीक्षा मंडळ मुंबई मार्फत मान्यताप्राप्त अभ्यासक्रमासाठी १८ ते ४० वयोगटातील दिव्यांग, अस्थिव्यंग, मूकबधीर, अंध, मतिमंद, मुला–मुलींना प्रवेश देण्यात येत आहे. या प्रशिक्षण केंद्रात विद्युत तारतंत्री, सर्व्हिसिंग ऑफ इलेक्ट्रीक डोमेस्टिक ऍप्लायसेंस, मोबाईल रिपेअरिंग अँड सर्व्हिसिंग, फीटर, एलिमेंट ऑफ कॉम्प्युटर इंजिनिअरींग, कॉम्प्युटर ऑपरेशन विथ एम.एस. ऑफीस, डेस्क टॉप पब्लिशिंग, कॉम्प्युटर अकाऊंटींग व ऑफिस ऑटोमेशन व अगरबत्ती, खडू, धुप बनवणे इत्यादी अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यात येत आहे.

इच्छुक दिव्यांग, अस्थिव्यंग, मूकबधीर, अंध, मतिमंद मुला–मुलींनी किंवा पालकांनी ३० जून २०२६ पर्यंत प्राचार्य तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र, भायेगाव रोड, देगलूर जि. नांदेड येथे पत्रव्यवहार करावा किंवा समक्ष भेटावे. अधिक माहितीसाठी मो. ९९६०९००३६९, ९४०३२०७१००, ७३७८६४११३६ वर संपर्क साधावा, असे आवाहन कर्मशाळा अधिक्षक तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र देगलूर यांनी केले आहे.

# आपले सरकार सेवा केंद्र मुलाखत प्रक्रियेबाबत आक्षेप–हरकत असल्यास सादर करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्हा सेतू समिती नांदेड मार्फत जिल्ह्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्रासाठी एकूण १ हजार २२० उमेदवारांच्या मुलाखतीचे आयोजन १५ व १६ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे करण्यात आले होते. या मुलाखतीचा अंतरिम निकाल शनिवार, १६ मे २०२६ रोजी जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर https://nanded.gov.in/ येथे प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.

या मुलाखतीनंतर करण्यात आलेली निवड ही अंतिम स्वरूपाची असून संबंधित उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची तपासणी व पडताळणी पूर्ण झाल्यानंतरच निवड निश्चित करण्यात येणार आहे. या मुलाखत प्रक्रियेबाबत कोणत्याही उमेदवारास काही आक्षेप/हरकत असल्यास त्यांनी त्याबाबतचा लेखी अर्ज आवश्यक पुराव्यांसह जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथील आवक कक्षामध्ये (तळ मजला) दिनांक १९ मे २०२६ ते २२ मे २०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत सादर करावा.

आक्षेप लेखी स्वरूपात (नोंदणी क्रमांकासह) असावा. संबंधित पुरावे/कागदपत्रांच्या प्रती जोडणे आवश्यक राहील. अर्जावर उमेदवाराचे नाव, ग्रामपंचायत, मोबाईल क्रमांक व स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा सेतू समिती नांदेड यांनी केले आहे.

# दुर्बल घटकांसाठी महावितरणची विशेष स्मार्ट योजना

**नांदेड (प्रतिनिधी)** –भारत सरकारच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासन व महावितरणच्या वतीने १ किलोवॅटची छतावरील सोलर सिस्टीम योजना (विशेष स्मार्ट योजना–२०२५) नावाने राबविण्यात येत आहे. ही योजना अनुदानावर आधारित आहे.

एक किलोवॅट छतावरील सौरऊर्जा प्रणालीस केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान उपलब्ध असणार आहे. महावितरणकडून राबविण्यात येणाऱ्या या योजनेत सौर प्रणालीसाठी भारतीय बनावटीचे आयईसी प्रमाणित सोलर मॉड्यूल्स वापरण्यात येत आहे. पुरवठादारांमार्फत ५ वर्षे देखभाल व दुरुस्ती असणार असून, योजनेत भाग घेण्यासाठी राष्ट्रीय पोर्टलवर नोंदणी आवश्यक आहे.

वैध घरगुती वीज जोडणी असणाऱ्या ग्राहकांनाच या योजनेत सहभाग नोंदविता येईल. सौर यंत्रणा बसविण्यासाठी घराच्या छतावर पुरेशी जागा असावी, ग्राहकाने इतर कोणत्याही सौर अनुदानित योजनेचा लाभ घेतलेला नसावा. फक्त घरगुती ग्राहकच या योजनेसाठी पात्र असतील. मागील १२ महिन्यांतील प्रत्येक महिन्यात १०० युनिटपेक्षा कमी वीज वापर असणारे ग्राहकच योजनेत पात्र ठरतील. दारिद्र्य रेषेखालील व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील ग्राहकांना प्राधान्य असणारी ही योजना आहे.

वीज बिलांचा भार कमी करणे, सौरऊर्जेतून स्वयंपूर्णता वाढविणे, शिल्लक वीज विकून ग्राहकांना अतरिक्त उत्पन्नाच्या संधी प्राप्त करणे, पर्यावरणपुरक व स्वच्छऊर्जा वापर वाढविणे, स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन हरित विकासाला चालना देण्यासाठी ही योजना महत्त्वाची आहे.

दारिद्र्य रेषेखालील ग्राहकांना योजनेत एक किलोवॅटसाठी एकूण ४७,५०० रुपयांचे अनुदान असून, २५०० रुपयांचा हिस्सा ग्राहकांनी भरावयाचा आहे. अनुसूचित जाती/जमातींच्या ग्राहकांसाठी एकूण अनुदान ४५ हजार इतके असून पाच हजार इतका ग्राहक हिस्सा भरणे आवश्यक आहे. सर्वसाधारण गटातील व इतर मागासवर्गीय वीज ग्राहकांसाठी ४० हजार रुपयांचे अनुदान असून त्यांनी दहा हजार रुपयांचा ग्राहक हिस्सा भरणे गरजेचे आहे. ही योजना दरमहा १०० यूनिटपेक्षा कमी वीज वापर असणाऱ्या ग्राहकांसाठीच आहे.

# स्त्री जन्माचे स्वागत करा -डॉ. सुधा कांकरिया



**अर्धापूर (प्रतिनिधी)**– स्त्री जन्माचे स्वागत करा, असे आवाहन पीसीपीएनडीटी स्टेट सुपरवायजरी बोर्ड सदस्या डॉ. सुधा कांकरिया यांनी केले. ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने आयोजित 'स्त्री जन्माचे स्वागत करा' या कार्यक्रमात त्या मार्गदर्शन करताना बोलत होत्या.

या कार्यक्रमात जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून पीसीपीएनडीटी स्टेट सुपरवायजरी बोर्ड सदस्या डॉ. सुधा कांकरिया उपस्थित होत्या. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्षा सौ. वैशालीताई देशमुख, नगरसेविका सौ. डॉ. पल्लवीताई लंगडे, चेअरमन प्रवीण देशमुख, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीकांत देसाई, डॉ. उत्तमराव इंगळे, ग्रामीण रुग्णालयाच्या अधिक्षिका डॉ. विद्या झिने, डॉ. युवराज डाहाळे, डॉ. विशाल लंगडे, डॉ. आनंद शिंदे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचा सत्कार ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने करण्यात आला.

यावेळी बोलताना डॉ. सुधा कांकरिया म्हणाल्या की, या चळवळीअंतर्गत ११ कलमी कार्यक्रम राबवून स्त्री जन्माचे नुसते स्वागत नको, प्रत्येक घरोघरी जाऊन मानसिकता बदलण्यासाठी जनजागृती करणे गरजेचे आहे.तसेच स्त्रीभ्रूण हत्या प्रतिबंध कायद्याची अंमलबजावणी व मुलगी जन्माचे स्वागत कशा पद्धतीने केले पाहिजे यासाठी प्रखर भूमिका घेण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन डॉ.सुधा कांकरिया यांनी केले.

यावेळी अनेक मान्यवरांची समयोचित भाषणे झाली. या कार्यशाळेस आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.



**लोहा** – भारताची जनगणना २०२७ सुरू असून, पहिल्या टप्प्यात फक्त घरांची गणना होत आहे. तालुक्यातील पोलेवाडी येथे दिव्यांग प्रगणक बालाजी आरसुलवाड प्रत्येक घरांची गणना करीत आहेत. (छाया : विनोद महाबळे)

# मुदखेड नगरपरिषदेच्या स्वीकृत सदस्यपदी डॉ. संदीप पचलिंग व ऋषिकेश पारवेकर यांची बिनविरोध निवड



**मुदखेड (प्रतिनिधी)**– नगरपरिषदेच्या निवडणुकीनंतर बहुप्रतीक्षेत आणि राजकीय वर्तुळात चर्चेत असलेल्या स्वीकृत सदस्य नगरसेवक पदाच्या निवड प्रक्रियेला अखेर १८ मे रोजी पूर्णविराम मिळाला. भारतीय जनता पक्षाच्या वर्चस्वाखाली असलेल्या नगरपरिषदेत स्वीकृत सदस्यपदी डॉ. संदीप शंकरराव पचलिंग आणि भाजपा युवा कार्यकर्ते ऋषिकेश पारवेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

नगरपरिषदेची विशेष सभा नगराध्यक्षा सौ. विश्रांतीताई माधव पाटील–कदम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण आणि भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार ॲड. श्रीजया चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड प्रक्रिया पार पडली.

यावेळी प्रभारी मुख्याधिकारी जगदीश दळवी, माधव पाटील कदम, सुनील शेटे, इम्रान शेठ मच्छीवाले, नगरसेवक रामसिंग, पाणीपुरवठा सभापती शाम चंद्रे, नगरसेवक उपेंद्र देवदे, नितीन चौदंते, संजय आऊलवार यांच्यासह अन्य मान्यवरांची उपस्थिती होती.

# आरक्षणवादी विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गात न घेण्याचा शासनाने काढलेला जीआर रद्द करण्याची रासपची मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)** –आरक्षणाचा लाभ घेणारे एससी, एसटी, ओबीसी उमेदवाराला घटनेप्रमाणे गुणवत्तेचे निकष पूर्ण करून सामान्य (ओपन) कोट्याचा लाभ घेता येतो आणि तो लाभ आजपर्यंत घेत आहेत आणि न्यायालयानेही तसा निकाल दिलेला आहे. परंतु महाराष्ट्र शासन आता कायद्याचे उलंघन करून एससी, एसटी, ओबीसी वर्गातील उमेदवाराला सामान्य (ओपन) कोट्यातून लाभ घेता येणार नाही, असा जीआर काढला. हा जीआर त्वरित रद्द करण्यात यावा, अशी मागणी रासपने एका निवेदनाद्वारे केली.

एससी, एसटी, ओबीसींची संख्या ८५% असून, त्यांना आरक्षण फक्त पन्नास टक्केच आहे, परंतु १५% सामान्य (ओपन) साठी ५०% कोटा राहातो. या पन्नास टक्क्यात आरक्षणधारक उमेदवार गुणवतेचे निकष पूर्ण करत असेल तर आरक्षण कोट्याऐवजी सामान्य कोट्यात प्रवेश घेता येत होते, परंतु शासनाने नवीन जीआर काढल्यामुळे ८५% समाजाला ५०% टक्यात कमी लाभ मिळतो आणि १५% सामान्यांना (ओपनला) पन्नास टक्याचा जास्तीचा लाभ मिळतो, तेव्हा हा अन्यायकारक जीआर त्वरित रद्द करावा, अशी मागणी राष्ट्रीय समाज पक्ष नांदेडच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन शासनाच्या धोरणाचा निषेध केला.

शासनाने जीआर रद्द केला नाही तर तीव्र आंदोलनाचा इशाराही देण्यात आला. यावेळी रासपचे राष्ट्रीय सचिव गोविंदराम शूरनर, नांदेड शहराध्यक्ष राजेंद्रकुमार तुडमे, सतीशचंद्र शिंदे, दत्ता चापलकर, ॲड. माणिकराव वाखरडे, मारोती पवार, सूर्यकांत गुंडाळले यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्री महालक्ष्मी महिला शेतकरी गटाकडून २०० लिटर दशपर्णी अर्काची निर्मिती



**नांदेड (प्रतिनिधी)** –सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धा २०२६ अंतर्गत पाणी फाउंडेशन, कृषी विभाग आणि उमेद यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड तालुक्यातील मौजे नांदुसा येथील श्री महालक्ष्मी महिला शेतकरी गटाने एकत्र येत इर्जिक पद्धतीने २०० लिटर दशपर्णी अर्क तयार केला.

अर्क निर्मितीसाठी लागणाऱ्या दहा प्रकारच्या वनस्पतींचा पाला गोळा करून त्याचे कुटण व प्रक्रिया करण्याचे प्रात्यक्षिक महिला सदस्यांनी प्रत्यक्ष सहभागातून केले. यावेळी सहायक कृषी अधिकारी तथा मेंटॉर वसंत जारीकोटे यांनी दशपर्णी अर्क तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया उपस्थित महिलांना समजावून सांगितली.

पाणी फाउंडेशनचे विशाल इंगळे यांनी जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी मृदा परीक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले. खतांच्या मात्रा परीक्षण अहवालानुसार योग्य पद्धतीने देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

कृषी विभागाचे सहायक कृषी अधिकारी तथा मेंटॉर कैलास पेरके यांनी गटामार्फत पुढील काळात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची तसेच त्यासाठीच्या गुणांकन पद्धतीची माहिती दिली. उमेदचे मेंटॉर कंदुरके यांनी प्रास्ताविकातून BBF पेरणी व उताराला आडवी मशागत याबाबत मार्गदर्शन केले.

या उपक्रमात गटातील सर्व महिला सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. SOP पद्धतीचा अवलंब करून सहकार्याने गटशेती व स्मार्ट शेती करण्याचा निर्धार यावेळी सदस्यांनी व्यक्त केला. तसेच स्पर्धेसाठी पूर्ण तयारी असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी गटाच्या निमंत्रक श्रीमती माया जनकवाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बाबाराव जनकवाडे, मन्मथ जनकवाडे, शिवदास जनकवाडे, दैवशाला डांगे यांच्यासह गटातील सर्व सदस्यांनी सहकार्य केले.

**पान १ वरून...**

**गॅस वितरणाच्या भोंगळ...**

अचानक सुरू झालेल्या आंदोलनामुळे काही काळ वाहतुकीचा पूर्णपणे खोळंबा झाला. महामार्गावर अडकलेल्या वाहनचालकांनाही मोठा मनस्ताप सहन करावा लागला. घटनास्थळी पोलीस प्रशासनाने तातडीने धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र नागरिक आक्रमक भूमिकेत असल्याने वातावरण अधिकच तापले होते.

दरम्यान, बिलोलीचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्याम पानेगावकर यांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थिती हाताळली व आंदोलनकर्त्यांशी संवाद साधला. त्यानंतर तहसील प्रशासनाशी संपर्क साधण्यात आला. तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड यांच्याशी संपर्क साधून नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्याबाबत आश्वासन देण्यात आले. तसेच नायब तहसीलदार येरावार यांनी घटनास्थळी दाखल होत नागरिकांशी चर्चा केली.

प्रशासनाकडून गॅस वितरणाचा प्रश्न तातडीने मार्गी लावला जाईल, नागरिकांची प्रत्यक्ष बैठक घेऊन संबंधित एजन्सीकडून योग्य कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन देण्यात आल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी अखेर चक्काजाम मागे घेत रस्ता मोकळा केला.

या घटनेमुळे नायगावातील गॅस वितरण व्यवस्थेतील अनागोंदी कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असून, प्रशासनाने तातडीने कठोर भूमिका घेण्याची मागणी सर्व सामान्य नागरिकांतून होत आहे.

------------

**नीट पेपरफुटी प्रकरणाविरोधात...**

गैरव्यवहार, दलालांचे जाळे आणि संस्थात्मक निष्काळजीपणा समोर येत आहे. त्यामुळे केवळ चौकशीच्या घोषणा न करता दोषींवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थी कृती समितीने केंद्र सरकार व संबंधित यंत्रणांसमोर विविध मागण्या ठेवल्या आहेत.

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर आवश्यक ती कारवाई करण्यात यावी व त्यांचा राजीनामा घेण्यात यावा. नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए)चे महासंचालक अभिषेक सिंग याच्यावर प्रशासकीय जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी व त्याचा राजीनामा घेण्यात यावा. नीट पेपरफुटीमुळे निर्माण झालेल्या मानसिक तणावातून आत्महत्या केलेल्या निष्पाप विद्यार्थ्यांच्या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन संबंधित जबाबदार व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. राधाकृष्णन समितीच्या अहवालातील कलम ६.१ नुसार पुनर्रचना करण्यात येऊन परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता, उत्तरदायित्व व तांत्रिक सुरक्षितता सुनिश्चित करण्यात यावी. या घोटाळ्यात सहभागी असलेल्या सर्व सूत्रधार, दलाल, अधिकारी, कर्मचारी व लाभार्थ्यांवर त्यांच्या पदाचा किंवा प्रभावाचा विचार न करता कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच या प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करून निश्चित कालमर्यादेत तपास पूर्ण करण्यात यावा व अहवाल सार्वजनिक करण्यात यावा.NEET पेपरफुटी हा देशातील विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित गंभीर गुन्हा मानून दोषींवर युपीएपी किंवा तत्सम कठोर कायद्यांतर्गत कारवाई करण्यात यावी. मानसिक तणावाखाली असलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्हा स्तरावर मानसिक आरोग्य सहाय्य हेल्पलाईन सुरू करण्यात यावी. तसेच राधाकृष्णन समितीच्या शिफारशीनुसार विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्य, समुपदेशन व भावनिक सहाय्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्यात यावी. आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना केंद्र सरकारकडून आर्थिक मदत व नुकसानभरपाई देण्यात यावी. परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना राज्य परिवहन बस व रेल्वेमार्फत मोफत प्रवास सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी.प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व कोचिंग संस्थांना रीनीट परीक्षेपर्यंत मोफत क्रॅश कोर्स, अभ्यास सत्रे, शंका निरसन सत्रे व समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना द्याव्यात. या घोटाळ्यात दोषी आढळलेल्या व्हिद्यार्थ्यांना किमान कायम नीट परीक्षेला बसण्यास बंदी घालण्यात यावी.अशा मागण्या घेऊन हे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली आहे.

स्मार्ट शेतकरी,
स्मार्ट शेती...

# शिवार

# हळदीची पाने पिवळी पडताहेत?

**हळदीची पाने पिवळी पडू लागल्यास लक्षणे तपासून योग्य उपाययोजना कराव्यात. वाढीच्या काळात एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन गरजेचे आहे...**



## हळदीची पाने पिवळी पडण्याची कारणे...

- समस्यायुक्त जमिनीमध्ये लागवड : हळद लागवडीसाठी क्षारपड जमीन (विद्युत वाहकता ४ डेसी सायमन प्रतिमीटर पेक्षा जास्त), चोपण जमीन (सामू ८.५ पेक्षा जास्त आणि विनीमययुक्त सोडिअमचे प्रमाण शेकडा १५ पेक्षा जास्त) आणि चुनखडीयुक्त जमीन (कॅल्शिअम कार्बोनेटचे प्रमाण शेकडा ५ पेक्षा जास्त) निवडलेली असेल तर अशा जमिनीत हळद पिकाच्या वाढीसाठी आवश्यक असणारे मुख्य व दुय्यम अन्नद्रव्ये (नत्र, स्फुरद, पालाश व कॅल्शिअम, मॅग्नेशिअम, गंधक) आणि सूक्ष्म अन्नद्रव्ये (लोह, जस्त, बोरॉन) यांची उपलब्धता कमी होते. हळदीच्या शेंड्याकडील पाने पिवळी पडून वाढ खुंटते. परिणामी पानांवर कायम स्वरूपी पिवळसरपणा दिसून येतो. अशा जमिनीत हवा- पाणी खेळण्याचे प्रमाण व्यस्त राहते. जमिनीची घनता वाढते म्हणजेच जमीन घट्ट बनते. जमिनीमध्ये नत्र, मॅग्नेशिअम आणि लोहाच्या कमतरतेमुळे पाने पिवळी पडतात.
- अधिक प्रमाणात पाऊस : अधिक पावसामुळे जमिनीत पाणी साचून राहते. परिणामी जमीन संपृक्त होते. हवा खेळती राहत नाही. अशा स्थितीत मुळांना श्वासोच्छ्वास (ऑक्सिजन) घेण्यास अडथळा येतो. पिकाला जमिनीतील अन्नद्रव्ये शोषून घेता येत नाही. परिणामी शेंड्याकडील पाने पिवळी पडतात. सततच्या पावसामुळे शेतात ओलावा कायम असल्यामुळे डवरणी करण्यास अडचण निर्माण होते. अति ओलाव्याने पाने पिवळी पडतात.
- अन्नद्रव्यांची कमतरता : लागवडीपासून ते काढणीपर्यंत जातिपरत्वे हळद पीक नऊ महिने शेतात राहते. उत्पादनाचा स्त्रोत जमिनीत वाढणारे गड्डे (कंद) असल्यामुळे बऱ्याच जणांचा असा गैरसमज असतो की, नत्रयुक्त खते जसे युरिया दिल्यास हळदीचे गड्डे खराब होतील. त्यामुळे हळद पिकास शिफारशीत मात्रेत नत्र युक्त खते मिळत नाहीत. जमिनीतील अन्नद्रव्ये जसे नत्र, मॅग्नेशिअम आणि लोह यांची कमतरता असल्याने पाने पिवळी पडतात.
- ढगाळ वातावरणामुळे अपुरे प्रकाश संश्लेषण : सतत ढगाळ वातावरण राहिल्यास अपुऱ्या सूर्यप्रकाशामुळे प्रकाश संश्लेषण क्रिया मंदावते. परिणामी पाने स्वतःचे अन्न (हरित द्रव्य) तयार करू शकत नाहीत. यामुळे पाने पिवळी पडतात.



## उपाययोजना करताना...

- जमीन व्यवस्थापन : लागवडीसाठी मध्यम प्रतीची, भुसभुशीत व पाण्याचा चांगला निचरा होणारी, उत्तम सेंद्रिय पदार्थ असलेली जमीन निवडावी. जमिनीत गरजेपुरता सतत वाफसा असणे गरजेचे आहे. त्यामुळे बारीक तंतुमय मुळांची वाढ चांगली होण्यास मदत होते. चोपण, क्षारपड, चुनखडीयुक्त जमिनीमध्ये हळद लागवड करू नये. लागवडीपूर्वी माती परीक्षण करून घ्यावे. त्यामुळे खतांचे नियोजन करणे सोयीस्कर होते. जमिनीचा सामू ६.५ ते ७.५ पर्यंत असावा. सेंद्रिय कर्बाचे प्रमाण ०.८ टक्के पेक्षा जास्त असावे. सेंद्रिय कर्बामुळे जमिनीच्या भौतिक, रासायनिक आणि जैविक गुणधर्मावर चांगले परिणाम दिसून येतात. अन्नद्रव्य पुरवठ्याचा वेग हा जमिनीतील सेंद्रिय कर्बावर अवलंबून असतो. चुनखडीयुक्त जमिनीत दरवर्षी भरपूर प्रमाणात सेंद्रिय खते मिसळल्यास आणि खोल नांगरट करून गंधकाचा वापर केल्यास चुनखडीचा पिकावरील वाईट परिणाम कमी करता येतो. हिरवळीची खते उदा. ताग, धैंचा घेऊन ती ४५ ते ५० व्या दिवशी जमिनीत गाडावीत. अधिक पाऊस झालेल्या प्रदेशांमध्ये शेतात पाणी साचले असल्यास चर खोदून पाणी उताराच्या दिशेने शेता बाहेर काढावे. कॉपर ऑक्सिक्लोराईड २ ग्रॅम प्रती लिटर पाणी या प्रमाणे आळवणी किंवा फवारणी करावी. हळद बेण्यास जैविक (जीवाणू संवर्धक) बीजप्रक्रिया करावी. अझोस्पिरीलीम १० ग्रॅम + स्फुरद विरघळणारे जिवाणू संवर्धक १० ग्रॅम + व्हॅम २५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून त्यामध्ये बेणे १० ते १५ मिनिटे बुडवून लगेच लागवडीसाठी वापरावे. ही जीवाणूजन्य खते जमिनीद्वारे दिलेली रासायनिक खते पिकाला सहज उपलब्ध करून देण्यास मदत करतात. प्रक्रिया केल्यामुळे बेणे कीड, रोगांना बळी पडत नाही.
- अन्नद्रव्यांचे नियोजन : नत्राची कमतरता असल्यास युरिया २ टक्के (२० ग्रॅम प्रती लिटर पाणी) याप्रमाणे पानांवर फवारणी करावी. रासायनिक खतांचा वापर करताना नत्र अमोनिअम सल्फेटद्वारे, स्फुरद डाय अमोनिअम फॉस्फेटद्वारे आणि पालाश सल्फेट ऑफ पोटॅशद्वारे हळद दिल्यास खतांची आणि पर्यायाने अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढते. रासायनिक खते पृष्ठभागावर फोकून देऊ नयेत, ती जमिनीत पेरून मातीत मिसळून द्यावीत. सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर माती परीक्षणानुसार करावा. लोह हे फेरस सल्फेटद्वारे, झिंक हे झिंक सल्फेटद्वारे, बोरॉन हे बोरक्सद्वारे जमिनीत सेंद्रिय खतात मिसळून द्यावे. नैसर्गिक चिलेट म्हणून त्याचा उपयोग होतो. त्यामुळे सूक्ष्म अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढते. हळदीला (पावडरला) गर्द पिवळा रंग येण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कुरकुमीन घटकाची योग्य प्रमाणात वाढ होण्यासाठी गंधक हे आवश्यक असते. पाने लोहाच्या कमतरतेमुळे पिवळी पडल्यास पानांवर ५० ग्रॅम फेरस अमोनिअम सल्फेट किंवा फेरस सल्फेट प्रति १० लिटर पाण्यात मिसळून ३ ते ४ वेळा फवारणी करावी. फवारणीसाठी लागणारी सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खते चीलेटेड स्वरूपात असल्यास उपलब्धता वाढते. फवारणी करताना जमिनीत ओलावा असणे गरजेचे असते. चिलेटेड सूक्ष्म अन्नद्रव्यांचे फवारणीचे प्रमाण १० ते २० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी असे ठेवावे. फवारणीसाठी शासन प्रमाणित सूक्ष्म अन्नद्रव्ये ग्रेड- २ किंवा महात्मा फुले कृषी विद्यापिठाने उत्पादित केलेले द्रवरूप फुले मायक्रो ग्रेड -२ यांचा वापर करावा. माती परीक्षण अहवालामध्ये जमिनीमध्ये लोह आणि जस्ताची कमतरता असल्यास शिफारशीत खत मात्रे बरोबर शिफारशीत प्रमाणात सूक्ष्म अन्नद्रव्ये हे रासायनिक खते तसेच शेणखतात मिसळून द्यावीत.

# एकात्मिक कीड व्यवस्थापन



**एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीत पीक लागवडीपासून कीड नियंत्रणाच्या विविध पद्धतीचा योग्य प्रकारे वापर करून किडींची संख्या आर्थिक नुकसानीच्या पातळीखाली ठेवली जाते. यात पर्यावरणाचा समतोल साधला जातो. कीडनाशकांचा वारंवार वापर टाळण्याकडे कल असतो. त्यामुळे उत्पादनामध्ये कीडनाशकांचे अंश राहत नाहीत. गेल्या काही वर्षांमध्ये रासायनिक कीडनाशकांच्या वापरामध्ये वाढ होत गेली आहे. पिकामध्ये कीड दिसली की आर्थिक नुकसानीची पातळी वगैरे फारसा विचार न करता रासायनिक नियंत्रणाचे उपाय वापरले जातात.**

## विपरीत परिणाम कोणते...

- रासायनिक कीडनाशकांचे अंश फळे, भाजीपाला, अन्नधान्यामध्ये दिसत असून, त्याचे परिणाम मानवी आणि पाळीव प्राण्यांच्या आरोग्यावर होत आहेत. परदेशातील कीडनाशक अवशेषाबाबतचे धोरण कडक असून, असे अवशेष आढळल्यामुळे शेतीमाल नाकारला जात आहे. सततच्या वापरामुळे किडींची रसायनाविरुद्ध प्रतिकार शक्ती वाढली आहे.
- पिकावरील किडींचे नैसर्गिक शत्रू सततच्या फवारणीमुळे नष्ट झाल्याने किडींवरील नैसर्गिक अंकुश नाहिसा होत आहे. परिणामी पूर्वी अल्प प्रमाणात नुकसान करणाऱ्या किडीही रौद्ररूप धारण करताना दिसत आहेत. परागीभवन करणाऱ्या मधमाश्या, बंबल बी अशा शेतीसाठी आवश्यक कीटकांची संख्या कमी होत आहे. या ऐवजी शेतीमध्ये पिकांचे निरीक्षण करून योग्य वेळी एकात्मिक कीड नियंत्रणाचे उपाय वापरणे आवश्यक आहे. या उपायासाठी निसर्गाला समजून घेतल्यास खर्चात बचत शक्य होईल.



## उपयोगी टीप्स...

### शिफारशीनुसार रासायनिक खतांचा वापर

पिकास नत्रयुक्त रासायनिक खतांचा वापर शिफारशीनुसार करावा. शिफारशीपेक्षा जास्त नत्रयुक्त खतांचा वापर केल्यास रसशोषक किडींचा प्रादुर्भाव वाढतो. पालाश किवा सिलिकायुक्त खताचा शिफारशीप्रमाणे वापर केल्यास किडीचा प्रादुर्भाव कमी होतो.

- कीड व रोगांची ओळख करून घेणे : आपण सामान्यतः जी पिके शेतात घेतो, त्यातील हानिकारक व उपयुक्त कीटकांचा परिचय करून घ्यावा. त्यासाठी परिसरातील कृषी विज्ञान केंद्र, कृषी विभाग, कृषी विद्यापीठ यातील कीटकशास्त्रज्ञ, रोग व विकृती शास्त्रज्ञ यांची मदत घ्यावी. शेतीविषयक माहिती गोळा करत राहावी.
- कीड व रोगप्रतिकारक वाणांची निवड : आपल्या परिसरात येणाऱ्या कीड आणि रोगांच्या प्रादुर्भावाची माहिती करून घ्यावी. अशा कीड किंवा रोगांना प्रतिकारक किंवा सहनशील जाती मिळवण्याचा प्रयत्न करावा. अधिक उत्पादनक्षम अशा कीड - रोग प्रतिकारक वाण कृषी विद्यापीठातून जाणून घ्यावेत. त्यांच्या बियाणांची मागणी करावी.
- पिकांची फेरपालट : एकाच प्रकारातील किंवा कुळातील पिकांची लागवड करू नये. उदा : तूर, हरभरा, टोमॅटो आदी पिकांवर घाटे अळीची उपजीविका होते. या पिकानंतर कपाशीचे पीक घेऊ नये. अन्यथा घाटे अळीचा प्रादुर्भाव अधिक प्रमाणात होतो.
- पेरणीच्या वेळात बदल : विभागवार पेरणीची एकच वेळ ठरवून पीक घ्यावे. अन्यथा एका विभागातील किडीचे नियंत्रण करणे अवघड जाते. यालाच 'झोनल सिस्टीम ऑफ प्लँटींग' असे म्हटले जाते.

## सापळा पिके

मुख्य पिकाचे हानिकारक किडींपासून संरक्षण करण्याच्या उद्देशाने किडींना जास्त बळी पडणारे दुसरे पीक मुख्य पिकासोबत लावले जाते. सापळा पिकांची लागवड ही शेताच्या चारी बाजूंनी करतात. याला 'पेरीमीटर ट्रॅप क्रॉपिंग' किंवा 'पी.टी.सी.' असे म्हणतात. विविध पिकांसाठी आवश्यक सापळा पिकाची निवड तज्ज्ञांच्या साह्याने करावी. आपल्या शेताचा आकार, मुख्य पिकाचे एकूण क्षेत्र इत्यादी वरून सापळा पिकाचे क्षेत्र अथवा त्याची प्रति चौरस मीटर संख्या (घनता) ठरवावी.

## सापळा पीक वापरण्याची तत्त्वे

सापळा पीक हे मुख्य पिकाच्या जीवनकाळात सुरुवातीपासून ते अखेरपर्यंत किडींना आकर्षित करणारे असावे. मुख्य पिकाशी अन्नद्रव्य, पाणी, जागा व प्रकाश या बाबतीत कमीतकमी स्पर्धा करणारे असावे. टप्प्याने सापळा पिकावरील किडींचे अंडीपुंज, अळ्या, कोष आणि प्रौढ अवस्था गोळा करून नष्ट कराव्यात. सापळा पिकावरील किडींची संख्या खूप वाढल्यास ते उपटून टाकून त्याची योग्य ती विल्हेवाट लावावी. उदा. कापूस या पिकाभोवती पिवळ्या रंगाच्या झेंडूची एक बॉर्डरलाइन लावून घ्यावी. झेंडूच्या पिवळ्या फुलांकडे हिरव्या बोंड अळीचा मादी पतंग आकर्षित होऊन त्यावर अंडी घालतो. झेंडूच्या मुळामधून हानिकारक अल्फा टर्थीनील हे रसायन स्त्रवत असल्याने सूत्रकृमींचे नियंत्रण होण्यास मदत होते. सणासुदीला या पासून मिळालेल्या फुलांतून अतिरिक्त उत्पन्न मिळू शकते. कपाशीमध्ये मूग, चवळी, मका यासारखी पिके घेतल्यास नैसर्गिक मित्रकीटकांचे प्रमाण वाढते. मुख्य किडींचा प्रादुर्भाव कमी होतो. भुईमूग पिकात शेताच्या चारी बाजूने सूर्यफूल या पिकाची बॉर्डरलाइन म्हणून लागवड करावी. भुईमुगावर येणारी केसाळ अळी, स्पोडोप्टेरा अळी अशा किडी सूर्यफुलाची मोठी पाने व पिवळ्या रंगाच्या फुलांकडे आकर्षित होऊन अंडी घालतात. सूर्यफुलावरील अंडीपुंज प्रादुर्भाव ग्रस्त पाने अळ्यांसहित नष्ट करावीत किंवा आवश्यकतेनुसार जैविक अथवा रासायनिक कीटकनाशकाची फवारणी करावी. ती कीड मुख्य पिकास हानी पोचवणार नाही.

## जैविक नियंत्रण

एकात्मिक कीड नियंत्रण पद्धतीमध्ये जैविक नियंत्रण ही महत्त्वाचे आहे. यामध्ये परोपजीवी कीटक, भक्षक कीटक, सूक्ष्म जिवाणू, विषाणू, बुरशी अशा घटकांचा समावेश होतो. या बाबी निसर्गात उपलब्ध असतात. मात्र, शेतामध्ये नियंत्रणाच्या अनुषंगाने योग्य प्रमाणात सोडण्याची आवश्यकता असते. प्रयोगशाळेत त्यांची अंडी व बिजाणूंची योग्य अशा वातावरणामध्ये वाढ केली जाते. अशा घटकांची उपलब्धता जैवतंत्रज्ञान प्रयोगशाळा, कृषी संशोधन केंद्र, कृषी विद्यापीठ होऊ शकते. त्यांचा वापर बीजप्रक्रियेपासून विविध टप्प्यामध्ये करता येतो. ती नेमकी समजून घ्यावी. यामुळे शेती उत्पादनातील कीडनाशकांच्या अवशेषांचे प्रमाण कमी ठेवणे शक्य होऊ शकते. उदा : ट्रायकोग्रामा, ऑस्ट्रेलियन बिटल असे मित्रकिटक. ट्रायकोडर्मा बुरशी.

# खरिपात बियाणे खरेदी करताना...

**दरवर्षीप्रमाणे पावसाची चाहूल घेत शेतकरी यंदाच्या खरिपाच्या नियोजनात व्यस्त झाला आहे. यंदाची पीक पद्धती निश्चित करताना वाणाच्या निवडीबरोबर बियाणे निवड व खरेदीदेखील तितक्याच चांगल्या प्रकारे झाली, तर खरिपाची पुढील वाटचाल यशस्वी करणे त्याला सुलभ होणार आहे. बाजारात असंख्य कंपन्या विविध वाण, खते तसेच अन्य निविष्ठा उपलब्ध करीत शेतकऱ्यांना आपल्या उत्पादनांकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशा धामधुमीत अत्यंत जागरूक व अभ्यासू राहून आपली कुठल्याही प्रकारे फसवणूक होणार नाही याची सतर्कता शेतकऱ्यांनी बाळगावी. हीच सतर्कता खरीप यशस्वी करण्यासाठी अत्यंत मोलाची ठरणार आहे.**



**खरिपाची लगबग प्रत्येक शिवारापासून ते गावागावातील कृषी सेवा केंद्रांपर्यंत दिसू लागली आहे. लहरी पाऊसमान, पीक पद्धती आणि त्यादृष्टीने निविष्ठा खरेदी यांचे गणित बळिराजा जुळवू लागला आहे. अशा धामधुमीत बियाणे खरेदीवेळी अत्यंत जागरूक राहून आपली फसवणूक होणार नाही याची सतर्कता बाळगण्याचे आवाहन तज्ज्ञांनी केले आहे. बियाणे लेबल, टॅग, पक्के बिल, त्यावरील सविस्तर विवरण या बाबींचा अभ्यासच नुकसान टाळण्यास किंवा त्याची भरपाई मिळवून देण्यास महत्त्वाचा ठरणार असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.**

बियाणे पॅकिंगवरील 'लेबल क्लेम' सर्वांत महत्त्वाचे. बियाणे कोणत्या हंगामासाठी तसेच कोणत्या विभागासाठी त्याची शिफारस आहे याची खात्री करावी. सत्यप्रत (ट्रूथफूल) बियाण्यांच्या गुणवत्तेची हमी व जबाबदारी संबंधित कंपनीकडे असते. बियाणे पॅकिंगवर टॅग व त्याचा रंग तपासून घ्यावा. टॅगवरील लॉट क्रमांक पाहावा. टॅगवरील टॅग क्रमांक, प्लॉट नंबर, आनुवंशिक, भौतिक शुद्धता, बीजोत्पादन, बीज प्रमाणीकरण अधिकारी यांची सही व शिक्का, बियाण्यांची उगवणशक्ती, ती तपासण्याची तारीख, बियाणे वापराची अंतिम तारीख ही माहिती महत्त्वाची आहे. परवानाधारक कृषी सेवा केंद्रांमधूनच खरेदी करावी. त्याची पक्की खरेदी पावती घ्यावी. बिलावरील सर्व रकाने नोंदविल्याची खात्री करावी. यात संबंधित शेतकऱ्याचे पूर्ण नाव,

## निविष्ठा खरेदी करताना...

पत्ता, बियाणे खरेदी तारीख, बियाणे उत्पादक कंपनीचे नाव, बियाण्याचा प्रकार, वाण, लॉट नंबर, उत्पादकाचे नाव, वजन, विक्री किंमत, छापील बिल क्रमांक आदी तपशील पाहावा. बिलावर संबंधित कृषी सेवा केंद्रचालक व शेतकऱ्याची सही असावी. पॅकिंगवरील छापील किमतीपेक्षा जास्त रक्कम आकारली गेल्यास जिल्हा नियंत्रक, वैद्यमापनशास्त्र (वजनमापे) यांच्याकडे लेखी तक्रार नोंदवावी. मुदतबाह्य, पॅकिंग फोडलेले सुटे बियाणे खरेदी करू नये. कापडी पिशवी तीनही बाजूंनी शिवलेली असावी. त्याच्या वरील बाजूला लेबल व बीजप्रमाणीकरण यंत्रणेचा वा कंपनीचा टॅग असतो. बियाण्याची पिशवी सीलबंद आहे याची खात्री करावी. लेबलवरील छपाई स्पष्ट असून, बीज प्रमाणीकरणाची मानके मापदंडानुसार असल्याची खात्री करावी. बियाणे वैध मुदतीचे असल्याची खात्री करावी. टॅगवरील बियाण्याचा प्रकार पाहावा. प्रमाणित बियाण्याचा टॅग निळा, तर सत्यप्रत बियाण्याचा टॅग फिक्कट हिरव्या रंगाचा असतो.

## सदोष बियाणे कसे ओळखाल?

- पेरल्यानंतर उगवणक्षमता पोषक परिस्थितीत खूपच कमी आढळल्यास.
- काडीकचरा, अन्य पिकाचे बियाणे, तणांचे बी यांचे प्रमाण टॅगवरील माहितीपेक्षा जास्त आढळल्यास
- बियाण्याचा एकसारखेपणा, झाडांचे बाह्य गुणधर्म यामध्ये एकसारखेपणा न आढळल्यास
- कणसात दाणे न भरल्यास, बोंडे कमी, वाढ एकसमान नसल्यास.



# तीर्थक्षेत्र विकासकामे दर्जेदार सुविधांसह कालमर्यादेत पूर्ण करावीत – मुख्यमंत्री

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांच्या जतन व संवर्धनास शासनाचे प्राधान्य असून तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. तसेच भाविक-पर्यटकांसाठी अत्याधुनिक सोयी सुविधासह आरोग्यसुविधाची उपलब्धता करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. यावेळी शिखर समितीच्या बैठकीत सहा तीर्थक्षेत्र विकासासाठी एकूण ९९३.७२ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यांना आणि निधीला मंजुरी देण्यात आली.



सह्याद्री अतिथीगृह येथे विविध तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, वनमंत्री गणेश नाईक, ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले,आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार धनंजय मुंडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह सर्व संबंधित अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकासाठी १७२ कोटींची तरतुद**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग क्षेत्राच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी कामे करावीत.या विकास आराखड्याअंतर्गत अत्याधुनिक बस स्थानक आणि पार्किंग सुविधा करण्यात यावी. या कामांसाठी जागांचे भूसंपादन वेळेत करावे. या प्रकल्पासाठी सुमारे १७२.२२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे मे २०२७ पर्यंत काम पूर्ण करावे. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी विविध वळण रस्ते आणि रस्ते रुंदीकरणाची कामे हाती घेण्यात यावीत. सध्या २.७ मीटर रुंदी असलेले रस्ते ७ मीटरपर्यंत रुंद करावा. भक्त आणि पर्यटकांच्या सुविधांसाठी मंदिर परिसरात पादचारी मार्ग, कव्हर्ड कॉरिडॉर, फ्लोअरिंग आणि एम्फीथिएटर, २५७ केएलडी क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, नवीन पोलीस स्टेशन आणि विश्रामगृह, भविष्यातील विकास आराखड्यांतर्गत डिंभे धरण परिसरात सबस्टेशन उभारणे, केबल कार (रोपवे) सुविधा सुरू करणे, एमटीडीसीच्या भीमाशंकर रिसॉर्टचा विकास करणे, राजापूर येथे नव्या पर्यटन सुविधांची निर्मिती करण्याचे नियोजन काटेकोरपणे करावे. आमदार बाबाजी काळे यांनी श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकास आराखड्यात सूचना केलेल्या कामांचा आराखड्यात समावेश करण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी केल्या.

**संत तुकाराम महाराज जन्मस्थानाच्या संवर्धनासाठी ४१ कोटींची तरतूद**

संत तुकाराम महाराज यांचे देहू येथील जन्म स्थान, वैकुंठगमन मंदिर परिसर तसेच भंडारा डोंगर परिसराच्या संवर्धन आणि विकासासाठी सर्वंकष आराखडा ४१.७१ कोटींचा आहे. या आराखड्यात संत तुकाराम महाराज जन्मस्थान मंदिर, वैकुंठगमन स्थळ, भंडारा डोंगर आणि परिसरातील इतर धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन करावे. यामध्ये रस्त्यांचे सुशोभीकरण, स्वच्छता व्यवस्था, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, पार्किंग व्यवस्था, भाविकांसाठी निवास सुविधा तसेच माहिती केंद्र उभारणे, भंडारा डोंगर परिसरात हरित क्षेत्र संवर्धन, वृक्षारोपण आणि नैसर्गिक सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात. आमदार सुनिल शेळके यांनी संत तुकाराम महाराज जन्मस्थानाच्या संवर्धन आराखड्यात सूचविलेल्या कामांचा आराखड्यात समावेश करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

**किल्ले अजिंक्यतारा जतन आणि संवर्धनासाठी १३४.८० कोटींची तरतूद**

सातारा जिल्ह्यातील ऐतिहासिक किल्ले अजिंक्यताराचे जतन, संवर्धन आणि परिसर सुशोभीकरणासाठी १३४.८० कोटी रूपयांचा विकास आराखडा आहे. यामध्ये नियोजित असलेल्या पायाभूत सुविधांचा विकास, नियोजित प्रेक्षक गॅलरी, नवे पादचारी मार्ग व लँडस्केपिंग,राज सदरेचे पुनरुज्जीवन, बुरूजांचे संवर्धन, पर्यटन आकर्षणे,अत्याधुनिक लटकता पूल,स्वच्छता व विश्रांती गृहांची कामे, तज्ज्ञांचे मार्गदर्शनाखाली नियोजित कामे वेळेत पार पाडावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

**संगम माहुली (सातारा) समाधी स्थळ संवर्धन प्रकल्पासाठी १३३ कोटींची तरतुद**

संगम माहुली समाधीस्थळ संवर्धनासाठी १३३ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. याअंतर्गत महाराणी ताराबाई, महाराणी येसूबाई आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधी स्थळांचा जीर्णोद्धार आणि लँडस्केप विकास केला जाणार आहे. याशिवाय, ऐतिहासिक संगमेश्वर मंदिर व घाटाचे संवर्धन, नवीन हँगिंग ब्रिज (झुलता पूल), व्ह्यूइंग गॅलरी आणि सुसज्ज पाथवेची निर्मिती करून या परिसराला जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ बनविण्यात येईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

**श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग विकास आराखडा (वेरुळ)साठी २१० कोटी रूपयांची तरतुद**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरुळ येथील प्रसिद्ध घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिराच्या विकासासाठी सुधारित आराखडा तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पाची एकूण किंमत आता २१०.४५ कोटी रुपये प्रस्तावित करण्यात आली असून, यामध्ये ५३.८२ कोटींच्या वाढीव निधीची मागणी समाविष्ट आहे. सध्या या ठिकाणी भाविकांसाठी अत्याधुनिक भक्त निवास, दर्शन बारी (प्रतीक्षागृह), शॉपिंग कॉम्प्लेक्स, फंक्शन हॉल, घाट आणि १.६ किमीचा बाह्य वळण रस्ता (बायपास रोड) यांसारखी कामे गतीने करावीत, असे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

**श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर परिसर विकासासाठी ३०१.५४ कोटींची तरतुद**

'श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर' परिसर मूळ आराखड्यातील पुढील नवीन कामांसाठी सुमारे ३०१.५४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आराखडाही तयार करण्यात आला आहे. तीन टप्प्यात या मंदिराची कामे वेळेत पूर्ण करावीत. पहिला टप्पा (मुख्य मंदिर परिसर) विकासामध्ये भव्य प्रवेशद्वारे, डिजिटल रांग व्यवस्था, प्रतीक्षागृहे, अन्नछत्र, योग-ध्यान केंद्र आणि मंदिर परिसराचे सौंदर्यीकरण,दुसरा टप्पा (तीर्थ व पुरातन स्थळे): हरिहर व मार्कंडेय तीर्थांचे वैज्ञानिक पुनरुज्जीवन, घाट, सायकल ट्रॅक, दिव्यांगसुलभ सुविधा, फुड कोर्ट आणि सीसीटीव्ही सुरक्षा व्यवस्था उभारणे. तिसरा टप्पा (मेरू पर्वत विकास) मेरू पर्वतावर भव्य शिवमूर्ती, शिवपुराण व वैदिक संग्रहालय, लेझर लाईट अँड साऊंड शो आणि ध्यानस्थळे विकसित करा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

पुण्याचे जितेंद्र डुडी जिल्हाधिकारी यांनी श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकास आराखडा व संत तुकाराम महाराज जन्मस्थान संवर्धन विकास आराखड्याचे सादरीकरण केले. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग विकास आराखडा व श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर परिसर विकास आराखड्याचे सादरीकरण केले. किल्ले अजिंक्यतारा जतन आणि संवर्धन व संगम माहुली (सातारा) समाधी स्थळ संवर्धन आराखडाचे सादरीकरण साताऱ्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी सादर केले.

# मान्सूनची दमदार आगेकूच! अंदमान-निकोबार पूर्ण व्यापले

**मुंबई (प्रतिनिधी)** – देशातील शेतकरी बांधवांसाठी आणि सर्वसामान्यांसाठी एक अत्यंत आनंदाची बातमी आहे. वर्ष २०२६ च्या नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी भारताकडे आपली वाटचाल अधिक गतिमान केली आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या ताज्या माहितीनुसार, आज १८ मे २०२६ रोजी मोसमी वाऱ्यांनी आग्नेय अरबी समुद्राच्या आणखी काही भागांत, कोमोरीन भाग आणि नैऋत्य व आग्नेय बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागांमध्ये यशस्वी प्रगती केली आहे.





मोसमी वाऱ्यांनी अंदमान समुद्राचा बहुतांश भाग व्यापला असून, संपूर्ण अंदमान आणि निकोबार बेटांवर मान्सूनचे आगमन झाले आहे. याशिवाय, पूर्व-मध्य बंगालच्या उपसागराच्या काही भागांतही मान्सून दाखल झाला आहे. मान्सूनची ही प्रगती वेळेआधी आणि समाधानकारक मानली जात आहे. हवामान खात्याने अंदाज वर्तवला आहे की, मोसमी वाऱ्यांच्या पुढील वाटचालीसाठी सध्या हिंदी महासागर आणि बंगालच्या उपसागरात अत्यंत अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. येत्या ३ ते ४ दिवसांत नैऋत्य मोसमी वारे आग्नेय अरबी समुद्र, कोमोरीन क्षेत्र, नैऋत्य आणि आग्नेय बंगालच्या उपसागराच्या उर्वरित भागांत तसेच पूर्व-मध्य बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागांमध्ये वेगाने पुढे सरकतील. अंदमानमध्ये मान्सून वेळेत दाखल झाल्यामुळे आता भारताच्या मुख्य भूमीवर म्हणजेच केरळमध्ये मान्सून कधी धडकणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

यंदा नैऋत्य मान्सून वेळेआधीच केरळात दाखल होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. सामान्यत: १ जूनच्या सुमारास पोहोचणारा मान्सून यंदा २६ मे रोजीच केरळ किनारपट्टीवर धडकू शकतो. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र अधिक सक्रिय झाल्याने मान्सूनचा वेग वाढला आहे. यंदा मान्सूनच्या सुरुवातीच्या टप्प्यात बंगालच्या उपसागरात किंवा अरबी समुद्रात कोणतेही चक्रीवादळ निर्माण झालेले नाही. त्यामुळे मान्सूनच्या प्रवासात कोणताही मोठा अडथळा येणार नसून तो सुरळीत पुढे सरकणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. तसेच, मान्सून ५ जूनपर्यंत गोव्यात दाखल होण्याची शक्यता असून ६ जूनपर्यंत तो कोकणात पोहोचू शकतो. तसेच ७ जूनपर्यंत पुण्यात मान्सून दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

# आयशर-कंटेनरच्या अपघातात; १२ वऱ्हाडी ठार तर २५ गंभीर जखमी

**मुंबई (प्रतिनिधी)** – मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर रविवारी एक अत्यंत हृदयद्रावक आणि धक्कादायक अपघाताची घटना घडली आहे. साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी वऱ्हाडी घेऊन जाणाऱ्या एका आयशर ट्रकची आणि कंटेनरची समोरासमोर जोरदार धडक झाली. या भीषण अपघातात १२ जणांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला आहे, तर २० ते २५ जण गंभीर जखमी झालेत. अपघाताची भीषणता पाहता मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या घटनेमुळे लग्नघरातील आनंदाच्या वातावरणावर विरजण पडले असून संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.





मिळालेली प्राथमिक माहिती अशी की, डहाणू तालुक्यातील बापूगाव येथून आयशर ट्रकमधून १०० पेक्षा जास्त वऱ्हाडी एका साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी निघाले होते. सर्वजण आनंदाच्या वातावरणात प्रवासाचा आनंद घेत असतानाच, पालघर जिल्ह्यातील धानीवरी गावाजवळ ही दुर्घटना घडली. भरधाव वऱ्हाड्यांचा ट्रक आणि समोरून येणाऱ्या कंटेनरमध्ये अत्यंत जोरदार धडक झाली. ही धडक इतकी भीषण होती की, धडकेनंतर आयशर ट्रक आणि कंटेनर दोन्ही वाहने रस्त्यावरच पलटी झाली.या भीषण अपघातात ट्रकचा चक्काचूर झाला असून आत बसलेले वऱ्हाडी खाली चेपले गेले. प्राथमिक माहितीनुसार, आतापर्यंत १२ जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. मृतांमध्ये आणि गंभीर जखमी झालेल्यांमध्ये महिला तसेच निष्पाप लहान मुलांचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे. अपघात होताच महामार्गावर आरडाओरडा आणि किंकाळ्यांनी परिसर हादरून गेला होता.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि महामार्ग पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. ट्रकमध्ये अडकलेल्या जखमींना नागरिकांच्या मदतीने बाहेर काढून तातडीने कासा उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. जखमींपैकी अनेकांची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याने डॉक्टरांचे पथक युद्धपातळीवर उपचार करत आहे.

या भीषण अपघातामुळे मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती आणि वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. पोलिसांनी क्रेनच्या साहाय्याने अपघातग्रस्त वाहने बाजूला सारून काही वेळात वाहतूक पूर्ववत केली. हा अपघात नेमका कसा झाला, याचे अचूक कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले, तरी प्राथमिक अंदाजानुसार वाहनाचा भरधाव वेग आणि चालकाचा निष्काळजीपणा यामुळे हा अपघात झाला असावा, अशी शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

# डॉ. बापूसाहेब काळे यांना राष्ट्रीय समाज भूषण पुरस्कार २०२६ प्रदान



**अहमदपूर (प्रतिनिधी)** – आरोग्य व सामाजिक क्षेत्रात मागील आठ वर्षापासून उत्कृष्ठ कार्य केल्याची दखल घेऊन महालक्ष्मी आधार फाउंडेशन सातारा यांच्या वतीने दिला जाणारा राष्ट्रीय समाजभूषण पुरस्कार २०२६ डॉ. बापूसाहेब काळे यांना मान्यवरांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, समाज सुधारणे संबंधी विविध उपक्रम राबवून राष्ट्रीय व सामाजिक दायित्व पार पाडीत मागील आठ वर्षापासून आरोग्य क्षेत्रामध्ये निस्वार्थपणे कार्य केल्याची दखल घेऊन महालक्ष्मी आधार फाउंडेशन सातारा यांच्या वतीने 'राष्ट्रीय समाज भूषण पुरस्कार २०२६' हा डॉ. बापूसाहेब काळे यांना नुकताच महालक्ष्मी आधार फाउंडेशन साताऱ्याच्या अध्यक्षा सौ. प्रतिभाताई शेलार यांच्या हस्ते प्रदान करून सन्मानित करण्यात आला यावेळी साई समर्थ पतसंस्था बेल्हे तालुका जुन्नर चे संस्थापक चेअरमन वसंतराव अण्णा जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती.

हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल डॉ. बापूसाहेब काळे यांचे मराठी साहित्याचे ज्येष्ठ समीक्षक तथा कादंबरीकार व महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूरचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील, प्रो. डॉ.अनिल मुंढे, प्रो.डॉ. सतीश ससाणे , प्रो.डॉ. पांडुरंग चिलगर, डॉ. बब्रुवान मोरे, डॉ. संतोष पाटील यांच्यासह मित्रपरिवाराने अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# नीट पेपरफुटी प्रकरणी मुंबई युवक काँग्रेसची मेट्रोमधून जनजागृती मोहीम

**मुंबई (प्रतिनिधी)** – मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्षा झीनत शबरीन यांच्या नेतृत्वाखाली आज मुंबई युवक काँग्रेसच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मुंबई मेट्रोमधून प्रवास करत नीट पेपरफुटी प्रकरणाविरोधात व्यापक जनजागृती मोहीम राबवली. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या पेपरफुटी रॅकेटविरोधात संताप व्यक्त करत भाजप सरकारच्या भूमिकेचा निषेध करण्यात आला.

मुंबई मेट्रोमध्ये प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांपर्यंत पोहोचत युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी नीट पेपरफुटी संदर्भातील सविस्तर माहिती असलेली पत्रके वाटली. या पत्रकांमध्ये देशभरात उघड झालेल्या विविध पेपरफुटी प्रकरणांची माहिती, अटक करण्यात आलेल्या आरोपींची पार्श्वभूमी, तसेच पेपरफुटी रॅकेट आणि सत्ताधारी भाजपाशी संबंधित व्यक्तींमधील संबंध यांचा उल्लेख करण्यात आला होता. पेपरफुटी ही केवळ परीक्षा व्यवस्थेतील चूक नसून ही संघटित भ्रष्ट व्यवस्थेची देण आहे, असा आरोप यावेळी युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी केला. या मोहिमेदरम्यान कार्यकर्त्यांनी प्रवाशांशी संवाद साधत लाखो विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फेरणाऱ्या या घोटाळ्यामुळे देशातील तरुणांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाल्याचे सांगितले. विद्यार्थी रात्रंदिवस अभ्यास करून परीक्षा देतात, मात्र सत्ताधाऱ्यांच्या संरक्षणाखाली पेपर विकले जात असतील तर सामान्य विद्यार्थ्यांनी न्याय कुठे मागायचा? असा सवाल युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित केला.

युवक काँग्रेसच्या अध्यक्षा झीनत शबरीन म्हणाल्या की, नीटसारख्या राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या परीक्षेची पेपरफुटी होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. लाखो विद्यार्थ्यांचे करिअर, पालकांची स्वप्ने आणि विद्यार्थ्यांची अनेक वर्षांची मेहनत एका भ्रष्ट रॅकेटमुळे उद्ध्वस्त होत आहे. देशातील तरुणाईला न्याय देण्यात भाजप सरकार पूर्णपणे अपयशी ठरले आहे. पेपरफुटीतील अनेक आरोपी भाजपाशी संबंधित असल्याची माहिती समोर येत आहे. पुण्यात ज्या संस्थांमध्ये काही आरोपी कार्यरत होते त्या संस्थांचेदेखील भाजपाशी संबंध असल्याची चर्चा आहे. पेपरफुटी प्रकरणातील आरोपींना राजकीय संरक्षण मिळत असल्यामुळेच अशा घटना सातत्याने घडत आहेत. चार विद्यार्थ्यांनी आतापर्यंत छएएढ परीक्षा रद्द झाल्यामुळे आत्महत्या केल्या आहेत या सरकारी हत्या आहेत. याला जबाबदार शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी अद्याप राजीनामा दिला नाही.

## जाहीर प्रगटन

### मा. श्रीमती आर.बी. सोरेकर दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अर्धापूर, यांच्या न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ८४/२०२६
वर्षा वाघोळे व इतर विरुद्ध निरंक

अर्जदार:-

१. वर्षा बालाजी वाघोळे,
वय: ३८ वर्षे, धंदा: गृहिणी
रा. मु. पोस्ट नाळेश्वर, नांदेड

२. ज्योती संतोष बगाटे,
वय: ३४ वर्षे, धंदा: गृहिणी
रा. देवगिरी कॉलोनी, रांजणगाव, औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार:-निल

दावा:- बॉम्बे रेगुलेशन अक्ट प्रमाणे वारसहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत...

या जाहीर प्रगटणाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मयत अक्षय पि. शिवाजी सूर्यवंशी व कमलाकर पि. शिवाजी सूर्यवंशी यांचे अर्जदार क्र. १ व २ हे मयतांचे सख्या बहिणी आहेत. अक्षय पि. शिवाजी सूर्यवंशी यांचा मृत्यू दिनांक ०१/०६/२०२४ रोजी झाला आहे व कमलाकर पि. शिवाजी सूर्यवंशी यांचा मृत्यू दिनांक ०८/०९/२०२५ रोजी झाला आहे. अर्जदारां शिवाय मयतांचे कोणीही वारस नाहीत असे अर्जदारांनी अर्जात नमुद केले आहे. अर्जदार यांनी मयत अक्षय पि. शिवाजी सूर्यवंशी व कमलाकर पि. शिवाजी सूर्यवंशी यांचा वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटण द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील संबधिताना मायातांचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसांच्या आत किंवा दिनांक १९/०६/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणा वर राहील. याची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०५/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

क. लिपिक
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अर्धापूर

आदेशावरुन
स. अधिक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, अर्धापूर

## जाहीर प्रगटन

(नावाशमनपाच्या हदीतील माजा मालकीची जमीन क्र.५/मधील ९.९३ पैकी एक लाख पाच हजार एकशे चौ. फुट जमीन सबंधी)

माझ्या पक्षकारांनी दिलेल्या माहिती आणि अधिकारानुसार सर्व जनतेस व संबंधीतांना सुचत करण्यात को नावाशमनपाच्या हद्दीतील मौजे म्हाळजा मालटेकडी रोड, नांदेड येथील असलेली फ्रुट मार्केट ज्या जमीनीवर आहे ती जमीन गट क्र.५/अ पैकी मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद मधील रिट पिटीशन क्र. ४५१/२०१८ मि दि.०५.०५.२०२२ नुसार झालेले फेरफार क्र. १८९७ दि.०१.०५.२०२५ आणि दुरुस्ती फेरफार क्र.२७०२ दि.३१.०७.२०२५ नुसार वरील मिळकत खाते क्र. २६२१ नुसार अरुणदास शिवराय कान्हेगावकर यांच्या मालकीची नोंद असलेल्या जमिनीपैकी माझ्या पक्षकारानी फ्रुट दुकान गाळा करीता जवळपास पूर्ण जमीनीपैकी एक लाख पाच हजार एकशे चौ.फुट जमीन सामाईकपणे खरेदी करण्याचा करार मिळकतीचे वरील मालक यांच्याबरोबर केला असून माझे पक्षकार लवकरच वरील करार पूर्ण करणार म्हणजे संबंधीत फ्रुट मार्केट गाळा धारकांच्या नावे विक्रीखात करवून घेणार आहेत.

तरी सर्व जनतेस आणि संबंधितांना सुचित करण्यात येते को, वरील मिळकत आणि करार व्यवहार संबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे उजर आक्षेप किवा मिळकतीवर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे मालकी हक्क, बारसा हक्क अधिकार, अतिक्रमण बाद असेल किंवा वरील मिळकतीवर शासकीय, खाजगी बँकेचे, सोसायटी, कर कर्ज, बोजा, बाकी असेल किंवा वरील मिळकत कोणत्याही प्रकारच्या करार म्हणजे विक्री, गहाण, हस्तांतर अदला बदली दान बक्षिस अंतर्गत बोजा खाली असेल तर हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसांच्या आत आपले उजर आक्षेप कागदोपत्री पुराव्यासह माझ्या कार्यालयात लेखी नोंदवावा, मुदतीत उजर आक्षेप न आल्यास माझे पक्षकार वरील व्यवहार पूर्ण करतील म्हणजे विक्रोखत करवून घेणार, मुदती नंतर आलेले उजर, आक्षेप, गृहीत धरले जाणार नाही, आणि माझे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही करीता हे जाहिर प्रगटन दि.१८.०५.२०२६

**जाहिर प्रगटन देणार**
**मोहम्मद सलीम एस. गिगानी (अॅडव्होकेट आणि नोटरी)**
**कार्यालय दुकान क्र.२४, जुना चुंगी नाका, म.न.पा. कॉमप्लेक्स रेल्वे स्टेशन रोड, नांदेड निवास : साई नगर, नांदेड मो.नं. ९४२२१७३३७३, ९०२८९९९४१३**

## Change In Name

My old name is **HAJI S. NOOR SYED** Which now I am Changing as new Name **SYED HAJI SYED NOOR.** Hence forth my all correspondence Will be done as per my new name. Please consider, the same.

**Address**
**5-3-309, Gadipura, Nanded, Itwara Nanded 431604**


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८


## जाहीरनामा

मौजे मुगट स्थित गट क्रमांक ५३४ क्षेत्र ३.९१ हे. आर. मधुन अर्जदार श्री अविनाश माधवराव पवार व ईतर रा. आमदुरा यांनी इतर अधिकारातील गैर अर्जदार ५८-५९ केशरसिंग लेहेलसिंग (१५१८६) यांचे इतर हक्कातील कुळाची काबीज नसलेली नोंद कमी करणे बाबत या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे.

त्या अनुषंगाने प्रकरणात ग्राम महसुल अधिकारी सज्जा मुगट व मंडळ अधिकारी मुगट यांचे मार्फत चौकशी अहवाल व नमुद शेतजमीन विषयी तपासणी सुची देऊन अहवाल मागविण्यात आलेला होता. ग्राम महसुल अधिकारी सज्जा मुगट यांचा अहवाल प्राप्त झाला असून इतर अधिकारात गैर अर्जदार ५८-५९ केशरसिंग लेहेलसिंग (१५१८६) अशी नोंद असुन सदर कुळाबाबत गावात चौकशी व स्थळ पहाणी केली असता केशरसिंग लेहेलसिंग हे मयत असून त्यांचे आज गावात कोणीही वारसदार राहत नसुन त्यांचा मृत्यू अंदाजे २५-३० वर्षापुर्वी झाला असल्याचे त्यांच्या अहवालात नमुद केलेले आहे.

करीता याव्दारे गैरअर्जदार केशरसिंग लेहेलसिंग त्यांचे काही वारसदार असल्यास त्यांना सुचित करण्यात येते की, सदर कुळ कमी करणे बाबत आपला काही आक्षेप अथवा काही सुचना असल्यास आपण आपले म्हणणे १५ दिवसांच्या आत म्हणजेच दिनांक ३०/०५/२०२६ रोजीपर्यंत कार्यालयीन वेळेल माझे समक्ष सादर कराव्यात. उक्त विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या कुठल्याही हरकती/सुचना स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच प्रकरणात सर्व हितसंबंधानी आपले लेखी म्हणणे सादर न केल्यास कुठलीही हरकत नसल्याचे गृहीत धरुन प्रकरणात नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**तहसीलदार**

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार फारूखी मोहम्मद अब्दुल मोहसीन वय ५० वर्षे रा. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून जाहिर प्रगटन देण्यात येते की, माझे पक्षकार फारूखी मोहम्मद अब्दुल मोहसीन हे गिन्याबाई वामन पवार रा. बारड, ता. मुदखेड व जि. नांदेड यांच्याकडून त्यांच्या मालकी व ताब्यातील मौजे बारड ता. मुदखेड येथील शेत गट नं. २५७ मधील ७ हेक्टर ९६ आर. जमीन असुन ज्याची चतु:सिमा पुढीलप्रमाणे, पुर्वेसः माळ, पश्चिमेस गणेश महादु आठवले, दक्षिणेसः लक्ष्मीबाई मारोती शिरगिरे, उत्तरेसः राजीव माणिक मुलंगे असुन ही मालमत्ता खरेदी करण्याचा सौदा केलेला असुन बयानापोटी रक्कम रूपये पण दिले आहे.

तरी वरील नमुद व्यवहाराबाबत कोणास काही आक्षेप उजर वा इतर काही बक्षीस कुळ इत्यादी असल्यास ते कागदोपत्री पुराव्यासहीत सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांच्या आत कळवावा गुदतीनंतर आलेले आक्षेप व उजर ग्राह्य धरल्या जाणार नसून ते माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही.

सबब हे जाहीर प्रगटन

**मार्फत**
**अॅड. शकील अहेमद**
**रा. जवाहरनगर, बाबानगर जवळ, नांदेड**
**मो.नं. ९०२८६२८६४६**

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## जुना नांदेडात 'मनपा'ची कारवाई; चिकन, मच्छी, भाजी मार्केट आणि बर्की चौकातील अतिक्रमणे जमीनदोस्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –महानगरपालिका आयुक्तांच्या आदेशानुसार अतिक्रमण निर्मूलन पथकाद्वारे सोमवार, दि. १८ मे रोजी जुन्या नांदेड भागातील मुख्य बाजारपेठांमध्ये धडक मोहीम राबविण्यात आली. इतवारा परिसरातील चिकन मार्केट, मच्छी मार्केट, भाजी मार्केट आणि ऐतिहासिक बर्की चौक परिसरातील अनधिकृत अतिक्रमणे हटविण्यात आली आहेत.

जुन्या नांदेडमधील इतवारा आणि बर्की चौक हा परिसर शहरातील अत्यंत गजबजलेला आणि मुख्य व्यापारी भाग आहे. गेल्या काही दिवसांपासून या भागातील चिकन, मच्छी आणि भाजी मार्केट परिसरामध्ये रस्त्यांवरच दुकाने थाटली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त होत होत्या. तसेच बर्की चौकात अनधिकृत हातगाडे आणि शेड उभारल्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होत होती. याचा पादचाऱ्यांना आणि वाहनधारकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता.



सततची होणारी वाहतूक कोंडी आणि नागरिकांच्या तक्रारींमुळे हे पाऊल उचलत महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने धडक मोहीम राबवत चोख पोलीस बंदोबस्तात या भागात थेट कारवाईला सुरुवात केली. चिकन व मच्छी मार्केटमधील रस्त्यावरील अनधिकृत ओटे, शेड आणि जाळ्या जप्त करण्यात आल्या. भाजी मार्केट-मधील रस्त्याची जागा अडवून बसणाऱ्या अनधिकृत विक्रेत्यांचे साहित्य हटवण्यात आले. तसेच बर्की चौकातील वाहतुकीला अडथळा ठरणारे अनधिकृत हातगाडे, फ्लेक्स आणि तात्पुरती अतिक्रमणे जेसीबीच्या साहाय्याने पूर्णपणे काढून टाकत साहित्य जप्त करण्यात आले.

सदरील कारवाई पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार व अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली उपआयुक्त अजितपालसिंघ संधु यांच्या नेतृत्वात अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई पार पाडली. या कारवाईत इतवारा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक भारती, पोलीस उपनिरीक्षक आवटे, शहर वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक कांबळे व त्यांच्या पथकासह अतिक्रमण विभागाचे सहायक आयुक्त रावण सोनसळे, अतिक्रमण पथक प्रमुख विशाल सोनकांबळे व महापालिकेचे ३० कर्मचारी तसेच पोलीस विभागातील २० कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. या कारवाई दरम्यान रस्त्यावर अनधिकृतपणे ठेवलेले मोठे साहित्य मनपाच्या पथकाने जप्त केले आहे.

## बोरगाव वाळू घाटावर डीआयजी उमाप यांच्या पथकाची कारवाई

### एक कोटी ३६ लाखांसह अन्य कारवाईत दोन कोटी ८६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी मोहिमेदरम्यान आणखी ४५ गुन्हे दाखल करून ७१ जणांविरुद्ध कारवाई करण्यात आली. एवढेच नाही तर लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत बोरगाव वाळू घाटावर कारवाई करीत एक कोटी छत्तीस लाखांची यंत्रसामुग्री जप्त केली आहे. तसेच अन्य कारवाई-मध्ये मोठी यंत्रसामुग्री जप्त केली आहे.

सदर मोहिमेच्या १७ व्या दिवशी पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या अधिपत्याखालील पथकाने नांदेड जिल्ह्यातील लिंबगाव पोलीस ठाणे हद्दीत बोरगाव येथील गोदावरी नदी घाटावर अवैधरीत्या



वाळू उपसा करणाऱ्या ९ जणांविरुद्ध कारवाइ करून त्यांच्याकडून दोन हायवा, एक टिप्पर, जेसीबी मशीन, इंजिन बोट, फायबर बोट, दहा तराफे व ५० ब्रास वाळू असा १ कोटी ३६ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

त्याचबरोबर अवैध गुटखा विक्री करणाऱ्या २ इसमांविरुद्ध कारवाई करून त्यांच्याकडून ३० लाख ६९ हजार ७४८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मटका जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या एकूण ११ इसमांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत ३ गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून ९१ हजार ९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यासोबतच अवैध दारू विक्री करणाऱ्या ३४ इसमांविरुद्ध २९ गुन्हे दाखल करून त्यांच्याकडून १ लाख ८८ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अवैध वाळू उपसा करणाऱ्यांविरुद्धही ३ गुन्हे दाखल करून त्यांच्याकडून १ कोटी १६ लाख ५५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. उपरोक्त कारवाई सोबतच शस्त्र अधिनियमान्वये २ कोप्टा अन्वये ५ तर इतर अधिनियमाखाली मिळून एकूण ४४ कारवाया करण्यात आल्या असून, यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून एकूण २ कोटी ८६ लाख ९ हजार ८८३ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.




**नांदेड** – 'नीट' पेपरफुटी संदर्भात कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी शिवसेना ठाकरे गटाचे महानगर प्रमुख मनोज यादव यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन दिले. यावेळी जिल्हाध्यक्ष राजेश माने, उप शहरप्रमुख राज यादव, लालचंद यादव, किशोर ठाकूर, भाया शर्मा, परवेज खान, अमजद लाला, किशन जाधव आदी दिसत आहेत. **(छाया : करणसिंह बैस, नांदेड)**

## अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन विशेष एकमार्गी रेल्वे गाड्या चालविण्याचा निर्णय

**नांदेड (प्रतिनिधी)**–प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेने विशेष एकमार्गी गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. या विशेष गाड्या १.३ पट भाडेदराने चालविण्यात येणार असून, खालीलप्रमाणे सेवा उपलब्ध राहणार असल्याचे दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड जनसंपर्क विभागाने कळविले आहे.

गाडी क्रमांक ०७८१२ तिरुपती-नांदेड विशेष गाडी मंगळवार, दि. १९ मे रोजी तिरुपती येथून रात्री २१:१० वाजता सुटून, रेणीगुंटा, कडप्पा, गुंतकल, रायचूर, सिकंदराबाद, निजामाबाद, बासर, मुदखेड मार्गे २० मे रोजी दुपारी १५:१० वाजता नांदेड येथे पोहोचेल. या गाडीला २२ डबे उपलब्ध असतील.

गाडी क्रमांक ०७८१३ लोकमान्य टिळक टर्मिनस-नांदेड विशेष गाडी बुधवार, दि. २० मे रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून दुपारी १२ वाजता सुटेल. ही गाडी कल्याण, नाशिक रोड, मनमाड, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, पूर्णा मार्गे प्रवास करून त्याच दिवशी रात्री २३:५० वाजता नांदेड येथे पोहोचेल. गाडीमध्ये १८ डबे असतील.

गाडी क्रमांक ०७८१४ नांदेड-तिरुपती विशेष गाडी गुरुवार, दि. २१ मे रोजी नांदेड येथून सायंकाळी १६:४५ वाजता सुटेल. ही गाडी मुदखेड, बासर, निजामाबाद, करीमनगर, वारंगल, विजयवाडा, नेल्लोर, रेणीगुंटा मार्गे प्रवास करून २२ मे रोजी दुपारी १२:३० वाजता तिरुपती येथे पोहोचेल. या गाडीमध्ये १८ डबे असतील. रेल्वे प्रवाशांनी या विशेष गाड्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

## उष्माघाताने अनोळखी वृद्धाचा मृत्यू

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – नायगाव पोलीस ठाणे हद्दीतील खैरगाव शिवारामध्ये नायगाव ते नरसी जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर एका अनोळखी वृद्धाचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून, संबंधित मृत व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी नायगाव पोलिसांनी नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

याबाबत नायगाव पोलीस ठाण्याचे पोलीस हेडकॉन्स्टेबल साई सांगवीकर यांनी दिलेल्या माहितीनुसार खैरगाव शिवारातील नायगाव-नरसी मार्गावर असलेल्या पांडुरंग ट्रेडर्स दुकानासमोरील बंद शटरच्या ओट्यावर अंदाजे ६० वर्षे वयाचा एक अनोळखी पुरुष मृत अवस्थेत आढळून आला. स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास ही बाब आल्यानंतर त्यांनी तत्काळ नायगाव पोलिसांना माहिती दिली.

## नांदेडात 'स्मार्ट' वीज चोरी; आठ जणांवर पोलीस कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)** –देय तारखेच्या आत वीज बील न भरणाऱ्या वीज ग्राहकांचा स्मार्ट मीटरच्या माध्यमातून वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर महावितरणच्या थकबाकीदार ग्राहकांनी आपले वीज बील न भरता सर्व्हिस वायरच्या माध्यमातून थेट वीज जोडणी घेऊन चोरी केल्याचे प्रकार नांदेड शहरात आढळून आले. याप्रकरणी गुरुवारी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात आठ वीज चोरांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती विभागीय कार्यालय, नांदेडद्वारे कळविण्यात आली आहे.

नांदेड शहरातील नुसरत सुलताना मिरजा अन्वर अली बेग रा. फतेहबुरुज, फेरोजखान इस्माईल खान रा. हिलालनगर, आसिफ अब्दुल हाजी, सुलताना बेगम मोहंमद खालेद रा. रज्जाक कॉलनी, परमार शिवनसिंघ चुडमनसिंघ रा. गाडीपुरा, सोफया बेगम अब्दुल मजीद रा. मोमीनपुरा, रामा रामजी धडके रा. शांतीनगर व बबीता नागेश रच्छेवार रा. विणकर कॉलनी यांनी त्यांचा थकबाकी पोटी वीजपुरवठा खंडित केलेला असताना त्यांनी बील न भरताच थेट सर्व्हिस वायर टाकून अनधिकृतपणे वीज वापर केल्याचे आढळून आले. त्यांच्याविरुध्द महावितरणच्या फिर्यादीनुसार गुरुवार, दि. १४ मे २०२६ रोजी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात भारतीय विद्युत कायदा कलम १३५ नुसार गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

## जिल्हाधिकारी कार्यालय व महापालिकेवर फेरीवाले व हॉकर्सचा मोर्चा धडकला

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहरातील फेरीवाले व हॉकर्सविरुद्ध मनपाच्या अतिक्रमण पथकाने कारवाई करून त्यांचे अतिक्रमण हटविले. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली. या फेरीवाले व हॉकर्सनी न्याय्य मागणीसाठी मनपा कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला.

सीटू संलग्न नांदेड महानगर हॉकर्स युनियनच्या वतीने यापूर्वी अनेक मोर्चे काढून मनपाला राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करण्यास भाग पाडले होते. या मागणीची दखल घेऊन तत्कालीन मनपा आयुक्त यांनी हॉकर्स झोन तयार करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु




मनपाला कायदेशीर अंमलबजावणी करण्याचा विसर पडला असून, मागील काही दिवसांपासून शहरातील पथविक्रेते व फेरीवाल्यांना हुसकावून लावण्याचा प्रयत्न सुरु केला असल्याचे संघटनेने म्हटले आहे.

दि. ९ मे रोजीच्या मेळाव्यात १८ मे रोजी महापालिकेवर धडक मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार सोमवार, दि. १८ मे रोजी मनपा व जिल्हाधिकारी कार्यालयावर फेरीवाले व हॉकर्सने मोर्चा काढून मागण्यांचे निवेदन दिले.

मागण्या मान्य न झाल्यास येत्या ३ जून २०२६ रोजी मुंबई मंत्रालयावर मोर्चा काढून नांदेड येथील हॉकर्सचे प्रश्न मांडणार असल्याचे कॉ. गंगाधर गायकवाड यांनी सांगितले.

## नायगाव आणि उस्माननगर येथे घरफोडी; लाखोंचा ऐवज लंपास

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील नायगाव आणि उस्मान-नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून लाखोंचा ऐवज लंपास केला. या दोन्ही घरफोड्या १६ ते १७ मे च्या दरम्यान करण्यात आल्या. याप्रकरणी नायगाव आणि उस्माननगर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

नायगाव तालुक्यातील कोलंबी येथील निरंजन गणपती पोतलवाड (वय २७) हे १६ मे रोजी रात्री प्रचंड उकाडा होत असल्याने आपल्या कुटुंबीयांसह दार पुढे करून झोपले होते. अज्ञात चोरट्यांनी या संधीचा फायदा घेत सहज घरात प्रवेश केला. कपाटाचे कुलूप तोडून कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने व नगदी असा तीन लाख ३५ हजार ३१८ रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. ही बाब सकाळी उघडकीस आल्यानंतर निरंजन पोतलवाड यांनी नायगाव पोलीस ठाण्यात धाव घेतली. घडलेला प्रकार पोलिसांना सांगितला. यानंतर नायगाव पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला आणि निरंजन पोतलवाड यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक तोटेवाड करत आहेत.

तर दुसऱ्या घटनेत उस्माननगर येथील इंडियन बार हे दुकान अज्ञात चोरट्यांनी लक्ष्य केले. चोरट्याने बारच्या पाठीमागील पत्रा वाकवून आत प्रवेश केला. ही घटना १६ मे ते १७ मे च्या दरम्यान घडली. चोरट्यांनी विविध प्रकारची दारू, सीसीटीव्ही फुटेची डीव्हीआर मशीन व रोख रक्कम असा एकूण ७९ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती महोत्सवासाठी कार्यकारिणी जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)** – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंती महोत्सवानिमित्त नांदेड येथे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, त्या अनुषंगाने दि. १६ मे रोजी शासकीय विश्रामगृह, नांदेड येथे नियोजन बैठक पार पडली.



या बैठकीत जयंती महोत्सव कार्यकारिणीची सर्वानुमते निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी पंढरी जायनुरे यांची तर सचिवपदी दीपक तुडमे यांची निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्षपदी दिगंबर माने व प्रेम देवदे, कार्याध्यक्षपदी शिवकुमार देवकते, कोषाध्यक्षपदी शशिकांत कोनापुरे, सहसचिवपदी प्रेम वीर यांची तर सदस्यपदी सागर काकडे, मल्हारी बैकरे व नारायण कोपनर यांची निवड करण्यात आली.

बैठकीत आगामी जयंती महोत्सव सामाजिक, सांस्कृतिक व प्रेरणादायी उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी कार्याचा व विचारांचा वारसा समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

यावेळी महेंद्र देमगुंडे, डॉ. राम मदने, ॲड. माणिकराव वाखरडे, गोविंद गोरे, प्रकाश लोहगावे, गजानन सरोदे, विठ्ठल काळे, मल्हार बैकरे, माणिक बोडके, डॉ. सोनटक्के, सुनील खरबे आदी मान्यवर उपस्थित होते.

## अवैध वाळू उपसा करणाऱ्या ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल; १ कोटीची यंत्रसामुग्री जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहराच्या नाभीस्थळी असलेल्या पवित्र गोदावरी नदीच्या इंजेगाव आणि बोंढार शिवारातील अवैध वाळू उत्खनन सुरू असल्याची माहिती मिळताच नांदेड ग्रामीण पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत तब्बल एक कोटी रुपयांची यंत्रसामग्री जप्त करून आठ जणांवर गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई रविवार, दि. १७ मे रोजी रात्री उशिरा केली.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत अवैध रेती व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले होते. त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मटवाड व सोबत पथकातील अंमलदार हे दि. १७ मे रोजी पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण हद्दीत अवैध धंद्याची माहिती काढून कारवाई कामी पेट्रोलींग करीत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली. या माहितीवरून इंजेगाव व बोंढार शिवारातील गोदावरी नदीपात्रात माधव मोतीराम जाधव (वय २५ रा. हिंदोळा ता. लोहा), इंद्रजितसिंग केसरसिंग सोखी (वय ४३ रा. नंदिग्राम सोसायटी नांदेड), शेख अजिम शेख सलीम (वय २८ रा. खुदबेनगर, नांदेड), पिंटू पाटील तिडके रा. बोंढार आणि इतर चार आरोपी हे गोदावरी नदीपात्रातील रेती अवैधपणे उपसा करुन तराफ्याच्या साह्याने काठावर आणून त्याचा साठा करीत होते, असे पोलिसांनी सांगितले.

मठवाड व अंमलदार हे मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास इंजेगाव शिवारातील गोदावरी नदीपात्रात छापा कारवाई केली. या कारवाईत अवैध रेती साठा, २०



तराफे, ६ इंजीन, एक बोट, एक एसीई कंपनीची क्रेन (एमएच २६ बीक्यु- २६९३) आणि एक आयचर (एमएच २६-बीई- ७३९३) आढळून आले. आरोपीच्या ताब्यातून एक बोट, एक आयशर वाहन, एक क्रेन पंचासमक्ष जप्त करुन इंजेगाव व बोंढार या ठिकाणी अवैध रेती उपसा करणाऱ्यांवर कारवाई केली आणि त्यांच्याकडून १ कोटी २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला व आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या कामगिरीचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव आणि उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत शिंदे यांनी कौतुक केले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com